# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०४.२०१७ वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१७ ची मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.०४.२०१७ रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | महापौर |
| २) | मा.शैलजा अविनाश मोरे | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १२) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १३) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १४) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १५) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |
| १६) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १७) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |
| १८) | मा.गोफणे अनुराधा देविदास | |

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.प्रमोद कुटे

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७०) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७१) मा.जयश्री वसंत गावडे

७२) मा.कोमल दिपक मेवानी

७३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७४) मा.सुलक्षणा राजू धर

७५) मा.शाम गणपतराव लांडे

७६) मा.सुजाता सुनिल पालांडे

७७) मा.योगेश मंगलसेन बहल

७८) मा.कदम निकीता अर्जुन

७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.पवार मनिषा प्रमोद

८६) मा.बारणे अर्चना तानाजी

८७) मा.अभिषेक गोविंद बारणे

८८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८९) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

९०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९१) मा.बारणे माया संतोष

९२) मा.निलेश हिरामण बारणे

९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९४) मा.दर्शले रेखा राजेश

९५) मा.कलाटे राहुल तानाजी

९६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९७) मा.ममता विनायक गायकवाड

९८) मा.कामठे तुषार गजानन

९९) मा.चोंधे आरती सुरेश

१००) मा.कस्पटे संदिप अरुण

१०१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०३) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०५) मा.कुटे निर्मला संजय

१०६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०८) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०९) मा.मुंढे उषा अंकुश

११०) मा.कदम शशिकांत गणपत

१११) मा.लोखंडे चंदा राजू

११२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११९) मा.नवनाथ दत्तू जगताप

१२०) मा.संतोष बबन कांबळे

१२१) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२२) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा,पाटील, मा.दुधेकर-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गट्टूवार, मा.पाटील, मा.घुबे-कार्यकारी अभियंता, मा.खोत- प्रशासन अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, १) ज्येष्ठ गायिका- किशोरी अमोनकर, २) ज्येष्ठ गझलकार -घनश्याम धेंडे, ३) सिमला, हिमाचल प्रदेश येथे बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ४४ नागरीकांचे निधन, ४) बाणेर येथील कार अपघातामध्ये मुलगी व आई सही ३ नागरीक यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभागृहनेतेपदी एकनाथ पवार यांची निवड झाल्यानंतर प्रथमत: सभागृह नेत्यांनी महापालिका खर्चामध्ये कपात होण्याच्या माध्यमातून महापालिकेची गाडी सोडलेली आहे तसेच स्थायी समिती अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सिमाताई सावळे सभापती यांनी सुध्दा महापालिकेची गाडी सोडलेली आहे. सभागृह नेते आणि स्थायी समितीच्या चेअरमन यांनी महापालिकेची गाडी सोडल्यामुळे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी मांडतो.

**मा.उषा ढोरे –** मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सभागृह नेते तसेच स्थायी समिती सभापती या दोघांचेही अभिनंदन करण्यात येत आहे.

मा.महापालिका सभा क्र-६६ दि.२०/१२/२०१६ व दि.२२/१२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ४ विषय क्रमांक – १

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
नस/१०/कावि/१७/२०१७ दि.२७/०३/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.महापालिका सभा, मा.स्थायी समिती, मा.विशेष समित्यांचे सभांचे कामकाज महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या तरतूदीनुसार करण्यात येते. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण-२ “महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादिंचे कामकाज” आणि त्याशिवाय “पिंपरी चिंचवड महानगर शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियम”

यामधील तरतूदीनुसार सभांचे आयोजन करण्यात येते. सभा आयोजनाकरिता सभेस उपस्थित पालिका सदस्यांची उपस्थिती नोंदविण्याबाबत उक्त नियमांत स्वयंस्पष्ट तरतूद नाही. सद्यस्थितीत सभेस उपस्थित पालिका सदस्यांची उपस्थिती ही हजेरी पत्रकावर स्वाक्षरी घेवून नोंदविण्यात येते. सद्य:स्थितीत ही सर्वमान्य पद्धत आहे.

माहिती व तंत्रज्ञानाचा सर्वच क्षेत्रांत प्रभावी वापर होत असताना सभा कामकाजामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कामकाजातील त्रुटी कमी करता येणे शक्य आहे. सभेच्या वेळी पालिका सदस्यांची हजेरी नोंदविताना हजेरीपत्रकावर पालिका सदस्याची स्वाक्षरी घेण्याऐवजी बायोमेट्रीक पद्धतीने पालिका सदस्याची सभेस येताना आणि सभा संपल्यानंतर जाताना थम्ब इंप्रेशन आणि फेस रीडिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पालिका सदस्याच्या सभेच्या उपस्थितीबाबतची नोंद घेतल्यास पालिका सदस्यास सभेकरिता निश्चित केलेल्या वेळेमध्ये सभेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. एका कामकाजाच्या दिवसामध्ये एक सभा एकापेक्षा अधिकवेळा तहकूब करण्यात आली असल्यास अशावेळी त्या दिवसाच्या पहिल्या सभेपूर्वी आणि त्या दिवसाच्या शेवटच्या सभेनंतर अशा दोनही वेळा पालिका सदस्याने बायोमेट्रीक पद्धतीने उपस्थिती नोंदविली असल्यास त्या दिवसाच्या सर्व सभांना पालिका सदस्य उपस्थित असल्याचे समजले जाईल. या पद्धतीमुळे पालिका सदस्यांना सुलभ पद्धतीने सभागृहामध्ये सभेची उपस्थिती नोंदविणे शक्य होईल. त्यामुळे पालिका सदस्यांचा सभांमधील सहभाग वाढेल आणि महापालिकेचे निर्णय घेताना विषयांवर विस्तृतपणे चर्चा होवून बहुसंख्य सभासदांचे संमतीने विषय पारित होवू शकतील, या पद्धतीने प्रत्येक सभेस पालिका सदस्याची सभेस येण्याची आणि सभेतून बाहेर जाण्याच्या वेळेची बायोमेट्रीक पद्धतीने थम्ब इंप्रेशन व फेसरिडींग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नोंद घेतली जाईल.

बायोमेट्रीक पद्धतीने घेतलेली उपस्थितीची नोंद हिच सभावृत्तांत तयार करताना आणि सभासद मानधन, सभा भत्ता पालिका सदस्यास अदा करताना अधिकृत समजली जाईल. बायोमेट्रीक पद्धतीने महानगरपालिकेच्या सभेस पालिका सदस्याची उपस्थिती नोंदविण्याची पद्धत शासन मान्यतेनंतर पूर्णपणे अंमलात येईपर्यंत हजेरीपत्रकावर स्वाक्षरी घेवून उपस्थिती नोंदविण्याची सध्याची पद्धतही सुरु राहील. तथापि, बायोमेट्रीक पद्धत सुरु करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर हजेरीपत्रकावर स्वाक्षरी घेवून पालिका सदस्याची उपस्थिती नोंदविण्याची पद्धत पूर्णपणे बंद केली जाईल आणि त्यानंतर पालिका सदस्याने प्रत्येक सभेस येताना आणि सभा संपल्यानंतर जाताना बायोमेट्रीक पद्धतीने थम्ब इंप्रेशन आणि फेसरिडींग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपस्थिती नोंदविणे अनिवार्य राहील. याप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५४ आणि कलम ४५७ (२) व ४५७ (१७) मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने सुधारित नियम तयार करणेसाठी शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुनिता तापकीर –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता याठिकाणी मला नगरसचिव साहेबांकडून खुलासा पाहीजे की महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५४, ४५७ (२) व कलम ४५७ (१७) मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने सुधारित नियम तयार करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणेबाबत असे प्रस्तावात शेवटी म्हणलेले आहे. पुर्वीची काय पध्दत होती, त्यास आपण शासन मान्यता घेतली होती का यासंदर्भात खुलासा करावा.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४३ (१) मध्ये महापालिका, स्थायी समिती, विशेष समित्या यांच्या सभा नियमान्वये विहीत करण्यात येतील अशा रितीने भरविण्यात आल्या पाहीजे आणि त्यानुसार कामकाज उरकण्यात आले पाहीजे अशाप्रकारचा नियम आहे. महानगरपालिकेच्या सभा कामकाजाची नियमावली करता ७ फेब्रूवारी १९८६ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार 'पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समितींच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियम' तयार करण्यात आलेले आहेत. त्याशिवाय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ अन्वये नमुद केलेले आहे त्यानुसार सभेचे कामकाज करण्यात येत आहे. तसेच सभा कामकाजाचे जे नियम आहेत ते संपुर्ण राज्याकरिता अनुसूची प्रकरण २ प्रमाणे आहेत. महापालिकेची सभा कामकाज नियमावली आहे त्याच्यामध्ये कुठेही सभागृहाच्या सदस्यांची उपस्थिती कशाप्रकारे नोंदवावी याबाबतची तरतूद नाही. तथापि स्वाक्षरी घेणे हे सर्वमान्य पध्दत आहे. यानुसार सभाकामकाज चालत असते त्यामुळे मा.आयुक्त साहेबांकडे दि.६/३/२०१७ रोजी जी बैठक झाली त्या बैठकीच्या सभावृत्तांता प्रमाणे हा विषय सभा कामकाजामध्ये घेण्यात आलेला आहे. बायोमेट्रीक पध्दतीने जर आपल्याला सन्मा.सदस्यांची उपस्थिती नोंदवायची असेलतर त्याकरिता आपल्याला नियमामध्ये सुधारणा करावी लागेल.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषयपत्रीकेवर विषय आणताना नगरसचिव साहेबांनी त्यामध्ये नमुद केलेल आहे की सदस्यांची उपस्थिती नोंदविण्याबाबत उक्त नियमात स्वयंस्पष्ट तरतूद नाही. सद्यस्थितीत सभेस उपस्थित पालिका सदस्यांची उपस्थिती ही हजेरी पत्रकावर स्वाक्षरी घेवून नोंदविण्यात येते. सदस्यस्थितीत ही सर्वमान्य पध्दत आहे. जर सर्वमान्य ही पध्दत असेलतर म्हणजे पहीले नियमात आहे परंपरेनुसार चाललेले आहे ते आपण ॲडॉप्ट केल आहे. भारतीय जनता पार्टी महापालिकेमध्ये सत्तेत आल्यानंतर आम्हांला परदर्शी कारभार करायचा आहे. सर्व नगरसदस्य सभागृहात उपस्थित रहावेत त्यांच्या सहया बायोमेट्रीक पध्दतीने व्हाव्यात यासाठी शासनाकडे या विषयाची शिफारस करण्याची आवश्यकता नाही. कारण की पहीला मुद्दा शासनमान्य नाही,

परंपरा आहे. जर पहील्याच नियमाला परंपरेनुसार गेलोतर पहीला नियम अस्तित्वात नसताना दुसरा नियम कसा करणार. त्यामुळे मा.महापौर साहेब, भारतीय जनता पार्टीच्या सत्ता बदलानंतर याठिकाणी आपण सत्तारुढ म्हणून या सभागृहामध्ये आहोत. माझी विनंती असेल की आपण हा विषय तात्काळ मंजूर करावा आणि पुढच्या महीन्यापासूनच बायोमेट्रीक पध्दत या सभागृहात लागू करावी, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचा विरोध नाही. बायोमेट्रीक पध्दतीने सभासद आले पाहीजे. या जोडीला आणखीन एक नियम वाढवा की सभागृहामध्ये कोणीही शस्त्र घेवून येणार नाही, हा सुध्दा त्यामध्ये नियम आणावा. प्रत्येक प्रभागाला ही बायोमेट्रीक पध्दत लागू करणार का. करायची असेलतर सरसकट लागू करा अन्यत: कुठेही लागू करु नका. बाकीच्या महापालिकेमध्ये अशी बायोमेट्रीकची पध्दत आहे का. सभागृहामध्ये तुम्ही काऊटींग कशी करणार याचा खुलासा करावा. एखादयाला वाटले बाहेर अर्जन्ट बोलावलेतर त्यांनी परत जातेवेळेस व सभागृमध्ये येतेवेळेस थम्ब करायचे का हा सुध्दा खुलासा झाला पाहीजे. एखादया विषयाला एखादया सदस्याला काही बोलायच नसतं किंवा त्याला विरोध करायच नसतो, सदस्य उठून बाहेर जातात परत सदस्य आत येतात. मग त्यावेळेस तुम्ही बायोमेट्रीक करणार आहेत का. हा सुध्दा खुलासा येथे झाला पाहीजे. काम करणार असालतर पुर्ण काम झाल पाहीजे. खुलासा व्हावा आणि त्या पध्दतीच्या सगळया गोष्टी त्याच्यामध्ये नमुद केल्या पाहीजेत. पारदर्शक आम्हांला सुध्दा पाहीजे आणि पारदर्शक म्हणजे काय हजेरी किंवा बायोमेट्रीक झाल्याने पारदर्शकता येणार आहे अशातला भाग नाही. तर ज्या विषयाला एखादयाचा विरोध असेल, मतदान पध्दतीने आपण विरोध नोंदऊ शकतो. परंतु जर सभागृहामधुन बाहेर गेल्यानंतर त्याचे तुम्ही कसे करणार. उदया एखादा कोर्टात जाईल किंवा त्याला म्हणायच आहे माझा या विषयाला विरोध होता परंतु काही लोक न बोलता विरोध दर्शवतात त्यावेळेला ते सभागृहाच्या बाहेर जातात. आमचा याला विरोध नाही परंतु याचा खुलासा झाला पाहीजे. अशी परिस्थिती असेलतर यासाठी काय नियम लावणार आहेत, हे सगळ जमणार का, प्रभागाला सुध्दा होणार का. हे नगरसेवकांसाठी होणार, येथे बसलेल्या अधिका-यांना हे होणार का या सगळया गोष्टी विचारात घेवून हा विषय एकसारखा सलग विषय झाला पाहीजे. हे करताना कशा पध्दतीने करणार. सभागृहामधुन प्रत्येकवेळेला बाहेर जाताना बायोमेट्रीक आत येताना बायोमेट्रीक करायची का. कारण सही आपण एकदा करतो येताना करतो जाताना सही करत नाही. पण आता हे दोन्ही वेळेला घेणार असालतर विषयाला विरोध असेल. काऊंटींग नोंदवायच असेलतर त्या पध्दतीचा खुलासा करावा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमत: सर्वमान्य पध्दत बंद करणार नाहीत. आजही अधिकारी याठिकाणी सही करत नाहीत. ज्यावेळेला आपण या सभागृहामध्ये विरोधाच आणि बाजूचे मतदान आपण मोजतो त्यावेळेला नाव घेत नाहीत,

आपण फक्त तोंडी मोजतो आणि त्यावेळेस जे जागेवर होते त्यांचा त्या बाजूने विरोध होतो किंवा सहमती असेल ते जे काही असेल ते त्यावेळेसच्या प्राप्त परिस्थितीनुसार असणार आहे त्याच्याशी याचा काडीचाही संबंध नाही. दोनच वेळेस बायोमेट्रीक होणार आहे. त्यामुळे या विषयाला मंजूरी दयावी व पुढच्या महीन्यापासून लगेच लागू कराव अशी आपणास विनंती राहील.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वांचे मी स्वागत करतो. मा.महापौर साहेब, बायोमेट्रीक पध्दत राबवावी याबद्दल आमचही कोणाच दुमत नाही. परंतु याठिकाणी मंगलाताईनी ज्या काही शंका उपस्थित केलेल्या आहेत बायोमेट्रीक पध्दत करत असताना यातला जो कोणी तज्ञ अधिकारी आहे त्यांनी ज्या शंका उपस्थित केलेल्या आहेत त्याचा खुलासा करावा. बायोमेट्रीक करण्यास आमची हरकत नाही हे पहील्यांदा स्पष्ट करतो. प्रश्न असा आहे की एकदा करायची का दोनदा करायची. बायोमेट्रीकच करायची तर सर्व सिस्टमॅटीक करा. मग व्होटींग सुध्दा बायोमेट्रीक पध्दतीने करा. मग हात कशाला वर करता. ईथ बसल्या बसल्या प्रत्येकाच्या समोर ईथं थम्ब इम्प्रेशन व्हायला पाहीजे, त्यांनी थम्ब इम्प्रेशनने मत नोंदवाव. पारदर्शकता तर सगळयांनाच पाहीजे. बायोमेट्रीक करताना तुम्ही कामकाज कसे करणार आहात. आयुक्तांचे डॉकेट आहे. राज्यशासनाने लक्ष घातलेले आहे आणि सांगीतल आहे की अशा पध्दतीने कामकाज करावं. आमचा विरोध नाही परंतु घाईगडबड कशाला करता, आमचे जे अज्ञान आहे ते दुर करा. तुम्ही सर्व सज्ञान आहात ठिक आहे परंतु आमच्यासारखे अज्ञान लोक पण या सभागृहामध्ये आहेत, आमचा विषयाला पाठींबा आहे. अधिका-यांनी सांगावे नेमकी ही पध्दत आपण का राबवतो. उल्हास जगताप यांनी सांगीतले अशी प्रचलीत पध्दत होती ती थांबवून अशा पध्दतीने बायोमेट्रीक करणार, ते करावे परंतु ज्या शंका त्यांनी उपस्थित केल्या आहेत त्या शंकेचे निरसन व्हायला पाहीजे, खुलासा करावा. एवढी घाई कशला. एवढया वर्षाची ही प्रचलीत पध्दत बंद करा हरकत नाही परंतु माहीती तरी दयावी. शंका उपस्थित केल्या त्याचा खुलासा करावा. एखादा दोन मिनीटे थांबून निघून गेला नंतर फिजीकल मतदान घेतो ते फिजीकल मतदान आपण हात वर करुनच घेणार आहेत का, का पुन्हा ते बायोमेट्रीकने घेणार आहेत. ही पध्दत प्रभागामध्ये होणार का याचे उत्तर दयावे.या दोन तीन शंका आहेत या शंकेच उत्तर दया. आमचा विषयाला पाठींबा आहे.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. योगेश बहल, मंगलाताई कदम यांनी पारदर्शक कारभाराला पाठींबा दिला त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो की खरंच पारदर्शी कारभार आम्ही करायला लागलो तुमच्या मनामध्ये कुठेतरी चलबीचल व्हायला लागली, मला वाटत की ही पहीली चुणूक आहे. ज्या पध्दतीने देशामध्ये मा.नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सत्तापरिवर्तन झालं आणि डिजीटल सुरवात करत असताना सगळाच कारभार हा पेपरलेस झाला पाहीजे अशा पध्दतीची एकंदरीत परिस्थिती आहे. मला असं वाटत

की प्रभाग समितीला करायचे का अजून कुठ करायच तर पहील्यांदा जीबीला तरी सुरवात करु. या शहरातील लोकांनी नगरसेवक म्हणून महापालिकेवर निवडून दिलेले आहे. नगरसेवकांना एवढयासाठी निवडून दिलं की जनतेची सेवा झाली पाहीजे. नगरसेवक निश्चितच त्या पध्दतीने महापालिकेच्या सभागृहामधुन आपले प्रश्न मांडतील. चांगल्या पध्दतीचा विचार या सभागृहाच्या माध्यमातून या शहरातील लोकांना दिला जाईल आणि मला असं वाटत की त्याची सुरवातही केली, आणि सुरवात करत असताना एक अत्यंत चांगल्या पध्दतीचा निर्णय या महापालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर एवढयासाठी घेतला की मलाही माहित आहे मागच्या काळामध्ये मी या महापालिकेच्या सभागृहात होतो. चार-चार महीने, सहा-सहा महिने सभागृहात न येता सहया केलेले नगरसेवक या सभागृहामध्ये होते. मला वाटत की महापालिकेच्या सभागृहाला एक निश्चित दिशा मिळाली पाहीजे, एक चांगली शिस्त मिळाली पाहीजे यासाठीच सुरवात केलेली आहे. महापौर साहेब, मी विनंती करतो की हा विषय मंजूर करावा.

**मा.महापौर -** विषय क्रमांक १ मंजूर करुन नगरसचिव माहीती देतील.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय मंजूर केल्यास आम्हांला मान्य आहे.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.मंगलाताईनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे सदरच्या विषयामध्ये मा.महापालिका सभा, मा.स्थायी समिती, मा.विशेष समिती सभे करिता ही पध्दत अवलंबविण्याकरिता विषय मा.महापालिका सभेसमोर मान्यता कामी सादर केलेला आहे. सन्मा.सदस्यांनी सभागृहात येताना आणि सभागृहातून बाहेर जाताना आशा दोन्ही वेळी बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविण्याच्या कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकण्यात आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.जयश्री गावडे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५ विषय क्रमांक – २

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/५/२०१७ दि.६/०४/२०१७

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासनव राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | २,४४,९६,०००/- | ४,८९,९२,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **२,८७,०३,०००/-** | **५,०३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासनव राज्य शासन एकूण अनुदान** | **७,९०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येत लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/३/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र "अ"**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ९४५६ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ८४६५ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ४९७९ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ४७७३ | |
| बांधकाम पूर्ण | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४२७० | |

| | | | |
|---|---|---|---|
| झालेल्या शौचालयांची संख्या | | | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ४८०७ लाभार्थी | GOI+GOM=२८८.४२ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/-हिस्सा |
| | | ULB =९६.१४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३८४.५६लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | २९७३लाभार्थी | GOI+GOM=१७८.३८ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/-हिस्सा |
| | | ULB =५९.४६ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२३७.८४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.कोमल मेवाणी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकण्यात आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.माधुरी कुलकर्णी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
मातंवि/१२/कावि/९०/१७ दि.१०/०४/२०१७

केंद्र शासनाचे स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे दि. ३१ मार्च २०१७ रोजी सादर करणेत आलेल्या शहराचे स्मार्ट सिटी प्रपोजलसाठी कार्योत्तर मान्यता मिळणे. तसेच, मंजुर प्रपोजलचे अनुषंगाने सदर अभियानांतर्गत राज्य स्तरीय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करणेत आलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरिता विशेष उद्देश वहन (SPV-Special Purpose Vechicle) स्थापन करणे आणि त्याअनुषंगाने अभियानाच्या वित्तिय आकृतीबंधानुसार महापालिकेचा स्व:हिस्सा उभा करणेचे (तरतुद करणेचे) अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहे.

**मा.करुणा चिंचवडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमची विनंती आहे की स्मार्ट सिटी बद्दल हा विषय आहे. याची संपूर्ण माहिती संबंधित अधिका-यांनी दयावी. हा विषय कोणत्या पध्दतीने आणला गेलेला आहे. त्याचे निकष काय आहेत, यासाठी कोणत्या गावाची किंवा कोणत्या नगराची यामध्ये आपण निवड केलेली आहे. निवड करताना काय निकष होते. आयुक्तांना अधिकार दयायचे म्हणजे नेमके काय करायचे. त्या समितीमध्ये किती सदस्य असणार, त्यांचे अधिकार काय असणार, लोकप्रतिनीधीचा त्यामध्ये काय सहभाग असणार आहे, लोकप्रतिनीधीचे काय अधिकार असणार, महापालिकेची जबाबदारी काय, राज्यशासनाची जबाबदारी काय, केंद्राची जबाबदारी काय ही माहिती सविस्तर सभागृला दयावी अशी विनंती आहे.

**मा.महापौर -** संबंधीत अधिकारी पोमण साहेब यांच्या अखत्यारीत हा विषय आहे, आयुक्त साहेब आणि पोमण साहेब याठिकाणी नाहीत त्यामुळे याच्या संदर्भात थोडक्यात माहिती दयावी.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. थोडक्यात माहिती आम्हांला नको, याची सर्वच माहिती पाहीजे तोपर्यंत विषय क्रमांक ३ तहकूब करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.डब्बू आसवाणी –** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
मातंवि/१२/कावि/९०/१७ दि.१०/०४/२०१७

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सारीका लांडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
स्था/बीआरटीएस/१६/२०१७ दि.११/०४/२०१७

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खालील १ ते ४ हे मुख्य रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले आहेत असे पत्र क्र.रेशा/४४३३/सन २०१७ दि.७/३/२०१७ चे कार्यकारी अभियंता सा.बा. (दक्षिण) विभाग, पुणे १ यांनी कळविले आहे. अ.क्र. ५ व ६ अदयाप महानगरपालिकेकडे हस्तांतरी झालेले नाही.

१. मुंबई-पुणे रस्ता (Old NH-4) भक्ती शक्ती निगडी ते हॅरीस ब्रीज दापोडी
२. औंध-रावेत रस्ता (Old NH-4) मुकाई चौक रावेत ते सांगवी फाटा राजीव गांधी पुल
३. देहू-आळंदी रस्ता (SH-116)
४. दिघी (पुणे)-आळंदी रस्ता (SH-129)
५. नाशिक फाटा ते मोशी इंद्रायणी नदीपर्यंतचा रस्ता (NH-50)
६. किवळे-मामुर्डी ते वाकड मुळा नदीवरील पुलापर्यंत (पश्चिम बाहय वळण मार्ग) (NH4)

वरील ६ रस्त्यांपैकी अ.क्र.१ ते ४ या मनपा हद्दीतून जाणारे राष्ट्रीय महामार्ग (NH4) व राज्य मार्ग यांची देखभाल दुरुस्ती, विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत. अ.क्र. ५ व ६ हे रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतर करणेत आलेले नसल्यामुळे यांची देखभाल दुरुस्ती, विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत नाहीत. सबब,

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मनपा हद्दीमधून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग De-Notification करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगीता नागरगोजे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापालिका हद्दीमधुन जे नॅशनल आणि राज्य महामार्ग जातात त्यातील दोन महामार्गाबद्दल व्यवस्थित माहिती घेवून कुठल्या याला काय फायदा होईल त्यासंदर्भात नीट माहिती घेवून पुढच्या सभेमध्ये ठेवण्यात येईल तोपर्यंत विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
स्था/बीआरटीएस/१६/२०१७ दि.११/०४/२०१७

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/४/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
कर/मुख्य/५/कावि/८६/२०१७ दि.११/०४/२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267 अ मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दिनांक 04/01/2008 रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ता करांचे दुपटी इतकी अवैध बांधकाम शास्ती सन 2012-2013 पासून आकारणीची अंमलबजावणी करणेत येत आहे.

अवैध बांधकाम शास्ती कराबाबत मा. नगरसदस्य, पदाधिकारी यांनी मा. स्थायी समिती व मा. महापालिका सभेमध्ये मुद्दे उपस्थित केले, विविध संघटना व राजकीय पदाधिकारी यांनी अवैध बांधकाम शास्ती कर न भरणेबाबत आवाहन केल्याने मिळकतधारकांमध्ये मिळकतकराचा भरणा करणेबाबत संभ्रम निर्माण झाल्याने त्याचा मिळकत कर वसूलीवर परिणाम होत असल्याने तसेच सदर विषयावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु असल्याने मनपाचे आर्थिक हित विचारात घेऊन अवैध बांधकाम शास्ती लागू करणेत आलेल्या मिळकतधारकांची प्रथमत: मूळ मिळकत कर बिलाची थकबाकीसह भरणा स्विकारुन जे मिळकतधारक अवैध बांधकाम शास्ती रक्कमेचा भरणा करु इच्छितात त्यांची अवैध बांधकाम शास्ती कराची रक्कम स्विकारावी. तसेच भरणा न केलेली अवैध बांधकाम शास्तीची रक्कम मिळकतधारकांचे नावे थकबाकी ठेऊन भरणा स्विकारणेबाबत परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/5/कावि/24/2015, दिनांक 12/01/2015 रोजीचे परिपत्रकान्वये पर्यायी संगणक प्रणाली विकसित करुन मूळ भरणा स्विकारणेत येत आहे.

सर्व महानगरपालिकांमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनाधिकृत निवासी बांधकामांवर प्रभावी आळा बसविण्याकरिता शास्तीची आकारणी करणेबाबत नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017 पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आकारणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| 1 | **600 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम** | **शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये.** |
| 2 | **601 ते 1000 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम** | **प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या50% दराने शास्ती आकारण्यात यावी** |
| 3 | **1001 चौरस फूटा पुढील निवासी बांधकाम** | **प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी(सध्याचे दराने)** |

शासन लेखापरिक्षणामध्ये अवैध बांधकाम शास्तीकर वसुलीबाबत उपस्थित केलेले आक्षेप विचारात घेऊन तसेच अवैध बांधकाम शास्ती कराबाबत शासन निर्णय पारित झाला असल्याने अवैध बांधकाम शास्तीची रक्कम मिळकतधारकाचे नावे थकबाकी ठेऊन भरणा स्विकारणेबाबत दिनांक 12/01/2015 रोजीचे परिपत्रकांन्वये विकसीत केलेली संगणक प्रणाली बंद करून दिनांक

11/01/2017 रोजीचे शासन निर्णयाची दिनांक 01/04/2017 पासून अंमलबजावणी करणेबाबत दिनांक 03/04/2017 रोजीचे परिपत्रक पारित केलेले आहे. शासन निर्णय व त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत निर्गत केलेले दिनांक 03/04/2017 रोजीचे परिपत्रकाचे अवलोकन करणेत आले.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शास्तीकर माफ करत असताना पिंपरी चिंचवड शहरावर निश्चितच राज्यशासनाकडून अन्याय झाल्याचे दिसते. आमची शिवसेना म्हणून अशी मागणी असेल की शास्तीकर हा पुर्णपणे माफ व्हावा. कुठल्याही प्रकारे कराचा बोजा हा जनतेवर न टाकता हा शास्तीकर पुर्णपणे माफ करावा. दुजाभाव न करता नागरीकांमध्ये कुठल्याही प्रकारची फुट न पाडता हा शास्तीकर पुर्णपणे माफ करावा.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शास्तीकराच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. ६०० स्क्वे.फुटापर्यंत निवासी बांधकामाला शास्तीकर आकारण्यात येऊ नये. ६०० ते १००० चौ.फु.प्रती मालमत्ता फुटापर्यंत ५० टक्के दराने माफ करावा आणि १००१ चौ.फुटा पुढील निवासी बांधकामास प्रती मालमत्ता शास्ती कर दुप्पट दराने शास्तीकर आकारण्यात यावा. हा शास्तीकराचा विषय आपल्या सर्वांना माहित आहे. सन २०१२-१३ पासून आपल्याकडे शास्तीकर लागू झालेला आहे. हा लागू करत असताना शास्ती नक्की काय याची अनेकवेळा या सभागृहात चर्चा झालेली आहे. इंग्रजाच्या काळामध्ये जिझीया कर जसा असायचा त्याचप्रमाणे शास्तीकर सर्वसामान्य नागरीकांना लावण्यात आलेला आहे. मी भारतीय जनतापार्टीचे मनापासून अभिनंदन करेल यासाठी की त्यांनी विषय आणला पण तो अर्धवट आणलेला आहे. विषय आणताना माझी राज्यशासनाला, पक्षनेत्याना, स्थायी समिती चेअरमनला, महापौरांना विनंती राहील की ज्यावेळेस आपण एखादया सर्वसामान्य नागरीकांचे घर हे ६०० स्क्वे.फुटाचे घर कोणाचे आहे. या ६०० च्या माध्यमातून किती नागरीकांना याचा लाभ होणार आहे. ६०० च घर नक्की आहे कोणाचे, कोणासाठी विषय हा आणलेला आहे. जास्तीचा कर हा जास्तीत जास्त आमच्या भागावर लादलेला आहे. मग ती चिखली असेल, च-होली असेल, मोशी असेल किंवा आमच्या ग्रामीण भागामध्ये लागू झालेला आहे. माझी विनंती आहे की ज्यावेळेला आपण १९९७ ला आमची गाव महानगरपालिकेमध्ये गेली ती गाव जात असताना त्या सरकारच्या काळामध्ये आपला एक चांगला निर्णय या सभागृहामध्ये मंजूर केलेला असताना ९७ ते २०१० दरम्यानच्या काळात सर्व टॅक्सची नागरीकांना माफी दिलेली होती, त्या काळामध्ये त्या ग्रामीण भागाच्या लोकांना, तो जी.आर. आपल्या समोर आहे. त्यामध्ये १०० टक्के माफी देताना तिथ कोणीही कोणाचा विचार केलेला नाही. म्हणून माझी आता पक्षनेत्यांना विनंती आहे की आपण विषय चांगला आणलेला आहे, लोकांना समाधानकारक आहे परंतु ६०० स्क्वे.फुट कोणाचे आहे, सर्वसामान्य नागरीकांचे घर बघीतलतर

कमीत कमी दोन ते आडीच हजार स्क्वे.फुटाच्या आतमध्ये घर नाही. मग माफी काय दयायची आपल्याला. त्यावेळेला २८ कोटीची ग्रामीण भागातील नागरीकांना माफी दिली आहे. या ६०० स्क्वे.फुटात शास्तीकरातील एकुण घर किती आहेत. त्याच्यामध्ये येणे बाकी किती. या ६०० स्क्वे.फुटामध्ये किती लोकांना लाभ होणार आहे याची माहिती दयावी. मग समजेल या शास्तीकराचा नक्की फायदा कोणाला आहे. मा.महापौर साहेब, आज आपल्या येथे झोपड सुध्दा ६०० स्क्वे.फुटाच नाही. त्यांना सुध्दा हा लाभ देऊ शकत नाहीत मग हा विषय आणला कशाला, आम्ही शास्ती माफ केली म्हणून म्हणायला. माझी आपल्याला विनंती आहे दयायच असेलतर सरसकट आजपर्यंत दयावी. हा शास्ती आली कधी ज्यावेळेस अनधिकृत बांधकामाचा विषय आल्यानंतर हा शास्तीकर आपल्यासमोर आलेला आहे. त्या काळामध्ये काय घडल, कसं घडल हे सगळ आपल्याला माहिती आहे. आम्ही सुध्दा त्या माध्यमातून अनेकवेळा या विषयावर बोललो आहेत. माझी विनंती आहे की लोकहिताचा निर्णय घ्यायचा असेल, नागरीकांचा फायदा करायचा असेल तर माझी आपल्याला या सभागृहाच्या वतीने सत्तारुढ पक्षाच्या नगरसेवकांना विनंती आहे की निर्णय घ्यायचा असेलतर सभागृहाने योग्य घ्यावा. मागच्यावेळेस शास्तीकराच्या बाबतीत आपण चुक केलेली आहे. आपण तो सभावृत्तांत फेटाळला, जसाचतसा शासनाकड गेला आणि शासनाने आपल्याला तो लादला गेला आहे तशी चुक न होता चुकीचा विषय शासनाला न जाता हा विषय व्यवस्थितरीत्या हाताळावा. पुन्हा एकदा शास्तीकराच्या माध्यमातून नागरीकांवर होणारा अन्याय दुर करावा. शास्तीकर २०१२-२०१३ पासून चालू झाला पण आपण शास्तीकर वसुल करतो २००८ पासून. गावे वगळायचा निर्णय हा २०/६/२००८ ला झालेला आहे. जर २०/६/२००८ ला ग्रामीण भागामध्ये टॅक्स माफीचा निर्णय झालेला असेलतर मला विचारायचे आहे की २००८ ते २०१२ च्या दरम्यानचा शास्तीकर हा आमच्या भागामध्ये लागू झाला कसा. एका बाजूने शासन आम्हांला टॅक्स माफीचा निर्णय देतं आणि दुस-या बाजुने हेच शासन शास्तीकर वसुल करतय म्हणजे नक्की काय? आंधळ दळतं आणि कुत्र पिठ खात असा काही प्रकार चालू आहे का? २०१० पर्यंत टॅक्स माफ झाला असताना २००८ पासून आपण वसूल करतो. त्या काळामध्ये अतीशय चांगला निर्णय झाला तोही निर्णय पक्षनेते तुम्हांला माहिती असेल. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रामध्ये नव्याने सामील झालेल्या गावातील मिळकतधारकांना मालमत्ताकराच्या थकबाकीतून सुट देणेबाबत. आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावातील तपशिलवार बाबी संदर्भातील महापालिका सभा ठराव विचारात घेता मुंबई प्रां.अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मालमत्ता कराची माफी सवलत देण्याचे आदेशास शासनाने मान्यता दिलेली आहे. महापालिका क्षेत्रामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावातील जे थकबाकीदार मिळकतकरधारक सन २०१०-११ या वर्षाचा मालमत्ता कर व शास्तीकराची रक्कम विषयांकीत शासन निर्णयाच्या तारखे पासून किंवा नोटीस प्राप्त झाल्या पासून यापैकी जो उशिरा होईल त्यापासून एक महीन्यात घर मालमत्ता

धारक भरणा करतील अशा मालमत्ताधारकांना मार्च २०१० पुर्वीच्या थकबाकी मध्ये १०० टक्के माफ केला जाईल हा निर्णय त्या काळामध्ये शासनाने घेतलेला आहे. त्यानंतर दुसरं अस आहे की वरील प्रमाणे थकबाकीदार मिळकतकरधारक नमुद कालावधीच्या तारखेपासून दोन महीन्याच्या आत २०१०-११ या वर्षीचा मालमत्ता कर व शास्तीकराची रक्कम २०१० पुर्वीच्या एकूण थकबाकी पैकी ८० टक्के थकबाकी भरतील त्यांना माफी राहील मात्र सदरील माफीच्यावेळी संबंधित मालमत्ताधारकांनी उरलेले २० टक्के थकबाकी कराचा भरणा करणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे जे थकबाकीदार मिळकत कर उक्त एक मध्ये नमुद कालावधीच्या तारखेपासून तीन महीन्याच्या आत सन २०१०-११ चा वार्षीक मालमत्ता कर व शासकीय कराची रक्कम भरतील त्यांन मार्च २००० पुर्वीच्या थकबाकीपैकी ५० टक्के थकबाकी माफी केली जाईल. सदरील माफी मिळकतीसंबंधीच्या मालमत्ता थकबाकीदारांच्या उर्वरीत ५० टक्के भरणे आहे. मिळकत २००८ ते २०११ चा मालमत्ताकर व शासकीय कराची रक्कम भरणा करतील त्यांना किंवा अशा मिळकतधारकांना २००६ पुर्वीची थकबाकी २०११ च्या संपुर्ण कराच्या रक्कमेचा भरणा करावा लागणार आहे. मा.महापौर साहेब त्या काळामध्ये आपण हा चांगला निर्णय घेतला असता त्यावेळेस आपण जी मागणी केली होती. एकूण २२.८२ कोटीची थेरगाव, चिखली, च-होली, मोशी असेल, किवळे, मामुर्डी किंवा या कालावधीमध्ये आपण जवळपास ४४ कोटीची माफी दिलेली होती. आज किती माफी मिळणार आहे, किती लोकांना याचा लाभ मिळणार आहे. असा जर काही निर्णय आपल्याला शासनाच्या माध्यमातून करता आला तर २०१७ पर्यंत किंवा २०१५ पर्यंत २०१६ पर्यंत जो काही निर्णय घ्यायचा किंवा आजपर्यंत घेतला तरी त्या लोकांना आपण न्याय दिला असं समजल जाईल. मा.महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, या माध्यमातून आपण ज्यावेळेला निर्णय घेणार आहोत निर्णय घेताना हे शासनाचे पैसे आहेत, हे पैसे शासनाला जाणार आहेत का महापालिकेला जाणार. शास्तीकर हा शासनाचा आहे का महापालिकेचा आहे याचा खुलासा करणे आवश्यक आहे. माझी विनंती आहे की शास्तीकराचा निर्णय घेताना सरसकट नागरीकांना जर त्याचा फायदा होत असेलतर जसे पुर्वी ग्रामीण भागाच्या माध्यमातून निर्णय घेतलेला होता. याचा फायदा आणि तोटा हा आपल्यालाच जास्त आहे. तोटा आपल्या ग्रामीण भागामध्ये जास्त होणार आहे म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की आपण या विषयाचा सखोल चांगला अभ्यास करुन या विषयी निर्णय घ्यावा. या शास्तीकराचा फायदा कोणाला आहे. ६०० स्क्वे.फुटामध्ये किती घर असतील. १००० च्या आतमधले आणि पुढचे किती घर किती, एकूण शास्तीकर किती, आपल्याला माफीमध्ये किती लोक बसणार आहेत याचा खुलासा करावा, मला परत बोलायच आहे.

**मा.उषा ढोरे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ११ जानेवारी २०१७ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये ६०० चौरस फूटापर्यंतचे निवासी अवैध बांधकामांना शास्तीची

आकारणी करण्यात येऊ नये, तसेच ६०१ ते १००० चौरस फूटापर्यंतचे निवासी अवैध बांधकामांना प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५० % दराने शास्ती आकारावी असे नमूद आहे. तथापि शहर हे औदयोगिक नगरी असल्याने सामान्य कामगारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे १००० चौरस फूट कारपेट क्षेत्रापर्यंतच्या निवासी अवैध बांधकामांना शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. तसेच सदर मिळकतींना आकारण्यात आलेली शास्ती पूर्वलक्षी प्रभावाने शासनाच्या मान्यतेने माफ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर बाबीवर शासनाकडून निर्णय होत नाही, तोपर्यंत जे मिळकतधारक शास्ती करापैकी काही रक्कम भरु इच्छितात, त्यांची रक्कम मनपास घेणे शक्य व्हावे म्हणून (मनपाचे आर्थिक हित पाहता) विकसित करणेत आलेली पर्यायी संगणक प्रणाली बंद न करता ती पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं म्हणजे शास्तीकराच्या संदर्भात गेल्या अनेक दिवसापासून हा प्रश्न आहे. मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आहे. गेल्या बारा-तेरा वर्षापासून या पिंपरी चिंचवड शहरामध्ये, ही पिंपरी चिंचवड औदयोगीक नगरी असल्यामुळे कष्टकरी कामगारांची घरे जसं नागरीकरण वाढल तशी घर झाली. त्या त्या काळामध्ये त्या त्या व्यवस्थेच्या कमकुवतपणामुळे या घराची निर्मीती मोठया प्रमाणात झाली. गेल्या बारा तेरा वर्षापासून आम्ही संघर्ष करत आलो. हे घरे अधिकृत झाली पाहिजेत. गत काळामध्ये आपण बघीतल असेल की त्या सत्ताधारी मंडळीनी हा शास्तीकराचे मुद्दे याठिकाणी उपस्थित केले. मला असं वाटत की शास्तीकर लावण्याचे काम याठिकाणी जे काही केल गेल आहे, आम्ही भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आहोत आमचा मुळ हेतू सर्वसामान्य कष्टकरी लोकांच्या घरावरच जे छत्र आहे त्याला कुठल्याही प्रकारचा असा जिझीया कर लाऊ नये. आणि म्हणूनच गेल्या अनेक वर्षापासून याठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस असतील त्यांनी सुध्दा या अनधिकृत घराच्या संदर्भामध्ये आंदोलनाला हजेरी लावली, अनेक नेत्यांनी हे अधिकृत करण्याच्या संदर्भात हजेरी लावली. ख-या अर्थाने मागच्या पंचवार्षीक मध्ये आपल्या शहराचे अध्यक्ष, आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप, आमदार मा.महेशदादा लांडगे. मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी हे घर अधिकृत करण्याच्या संदर्भामध्ये आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि म्हणून मी याठिकाणी स्वागत करेल की ख-या अर्थाने सुरवात केलेली आहे. ६०० स्क्वे.फुट. याठिकाणी उपसूचना केली याचेमध्ये दुजाभाव झाला नाही पाहीजे. या शहरामध्ये कामगार काम करतात आणि ख-या अर्थान या शहरामध्ये छोटस ६०० स्क्वे.फुट आपल घरकुल असेल त्याला शास्तीकर भरणे परवडत नाही या उद्देशान शासनाने तो निर्णय घेतलेला आहे. आमची सुध्दा भुमीका आहे की हा शास्तीकर

ख-या अर्थाने माफ झाला पाहीजे. ६०० स्क्वे.फुट सर्वसामान्याना भुर्दंड आहे तो १००० स्क्वे.फुटापर्यंत उपसूचनेव्दारे मांडलेले आहे. १ हजार स्क्वे.फुटापर्यंत सर्वसामान्य लोकांचे घर असते. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस असतील किंवा रज्यशासनाचे मी आभार मानेल त्यांनी हा विषय विधानसभेमध्ये उचलून त्याठिकाणी कायदा पारीत करण्याच काम सुध्दा येणा-या काळामध्ये हे घर अधिकृत केल्याच्यानंतर हा जो काही शास्तीकर आहे तो जे अनधिकृत घर असतं त्या अनधिकृत घराला शास्तीकर लावला जातो आणि ख-या अर्थान एकदा का ते घर अधिकृत झाले की शास्तीकर सुध्दा बंद होणार आहे. शास्तीकराचा मुद्दावर याठिकाणी चर्चा केली जाते. ख-या अर्थान भारतीय जनतापार्टी, सर्वसामान्यांच्यासाठी भारतीय जनता पार्टी, कष्टक-यांसाठी भारतीय जनता पार्टी काम करते हे आपण बघीतलेल आहे. मला खात्री आहे शासनाने हा जो निर्णय घेतलेला आहे तो पुढचा पुर्णपणे बंद करेल, धन्यवाद.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर गेल्या चार पाच वर्षापासून हा विषय या पिंपरी चिंचवड शहरासाठी अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे आणि गोरगरीबांचा विषय आहे. ज्या ज्या वेळेस भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी संघर्ष करीत होते त्या त्या वेळेस सेना असेल किंवा महाराष्ट्र नवनिर्माण सेना असेल आम्ही सर्वजण त्यांच्यासोबत राहून या शास्तीकराच्या संदर्भात, अनधिकृत बांधकामच्या संदर्भात सर्वसामान्याबरोबर अंदोलनामध्ये सहभागी होतो. खरेतर आदरणीय आमदार साहेबांचे मी मनापासून हार्दीक स्वागत आणि अभिनंदन करतो. कमीत कमी ६०० स्क्वे.फुटापर्यंत तरी हा नियम लागू करण्यात आला. परंतु ६०० स्क्वे.फुटाचे घर ३०३६२ आहेत त्याचप्रमाणे ६०० ते १००० च्या पुढे घर आहेत ती १७४५२ आहेत आणि १००० स्क्वे.फुटाच्या पुढे १६३८० घरे आहेत. एकूण ३३८३२ इतकी या घराची संख्या भरते. ही संख्या आपण पाहीलीतर ही खुप मोठी संख्या आहे. ग्रामीण भागामध्ये अजूनही काही घर आहेत. ज्यांची नोंदणी होणे अपेक्षीत आहे. त्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. अजूनही झपाटयाने बांधकाम वाढत आहे. खरेतर माझ्या वतीने आपल्याला नम्र विनंती करतो की सरसकट हा शास्तीकर पुर्णपणे माफ झाला पाहीजे. पिंपरी चिंचवड ही कामगार नगरी आहे. आपल्या सर्वाना आठवण करुन देतो की या सभागृहामध्ये काही सन्मा.सदस्यांनी या पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना संबोधीत केले होत की तुम्ही शास्तीकर भरु नका तो पुर्णपणे माफ होणार आहे तेव्हापासून आजपर्यंत शास्तीकर काही नागरीकांनी भरलेला नाही. ज्याठिकाणी त्यांना दहा रुपये भरायला लागत होते त्याठिकाणी त्यांना एक हजार भरावे लागतात. आणि आज ६०० स्क्वे.फुटाच्या आतली जी घर असतील त्यांचे पैसे भरुन नंतर पुढे माफ करणार आहेत. मा.महापौर साहेब, संपुर्ण शास्तीकर माफ व्हावा अशी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो शास्तीकराचा विषय आहे याच्यामध्ये तारीख टाकली गेलेली आहे. मी सभागृहामध्ये उपसूचना आहे त्यांच स्वागत करते परंतु त्या तारखेमध्ये याठिकाणी जी तारीख आहे परत शासनाकडे पाठविणार आहोत. या तारखेचा परत उल्लेख २०/४/२०१७ असा करावा. दत्ता काकानी सांगीतल की गडबड करुन हा विषय करण्यात काही अर्थ नाही कारण शेवटी हा नागरीकांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. आपण जर गडबड केली आणि परत आपल्या हातून एखादी चुक झालीतर परत त्याचा भूर्दंड आपल्याला सगळया नागरीकांना बसणार आहे. आणि म्हणूनच २०१५ आणि २०१७ या दोन वर्षात किती घरे वाढलेली आहेत याचा सर्व्हे झालेला नाही. शास्तीकर किती तारखेपासून किती तारखेपर्यंत माफ होणार यामध्ये २०१५ पर्यंतची तारीख आहे. मग पुढच्या दोन वर्षाचे काय होणार. शहरामध्ये आजही सगळीकडे मुबलक बांधकाम चालू आहेत. कोणीही नगरसेवक सांगत नाहीत की बांधकाम करा परंतु लोकांची परिस्थिती बघता कुटूंबे वाढलेली आहेत आपण सहानुभूतीपुर्वक हे बघत असतो. यांची कुटूंब वाढलेली आहेत, आपलीच लोक आहेत म्हणून आपण त्यांना पाठीशी घालत असतो. पुढच्या दोन वर्षासाठी परत पाच वर्षे संघर्ष करावा लागेल. त्याच्यापेक्षा आता माई ढोरे यांनी उपसूचना वाचलेली आहे त्याच्यामध्ये आजच्या तारखेची अट टाकावी. कमीत कमी हे शासनाकडे पाठविणार असूतर याच्यामध्ये हा विचार केला गेला पाहीजे. परत येणा-या निवडणूका डोळयासमोर बघता नागरीकांच्या फायदयाच्या दृष्टीने विचार केला गेला पाहीजे. त्यादृष्टिने कमीत कमी आजच्या तारखेपर्यंत हा विषय करावा किंवा माई ढोरे यांनी आजच्या तारखेची दि.२०/४/२०१७ पर्यंतची अट टाकावी.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजचा हा विषय कौतूकास्पद आहे. इतकी वर्षा पासून जे घडल नाही ते तुमच्या उपस्थितीत आणि पदाधिका-यांच्या कष्टातून हे यश आपल्याला बघायला मिळते. महापौर पद तुमच्याकडे आहे याचा आनंद होतो की हा विषय आपल्या महासभे समोर आला. मा.नरेंद्रजी मोदींचा नारा होता की, आच्छे दिन आयेंगे परंतु आच्छे दिन कहाँ हैं असे कुचेष्टेने लोक बोलायचे. परंतु आज मला वाटतय सगळयांच्या तोंडाच उत्तर आहे की आच्छे दिन कशाला म्हणतात, आच्छे दिन कसे आहेत हे निश्चितच आजचा हा विषय मंजूर केल्यानंतर ठरणार आहे. ६०० स्क्वे.फुटाच नागरीकांचे छोटेशे घर असेल परंतु आज उपसूचनेसह हा विषय आपण करणार आहोत. एक हजार स्क्वे.फुटापर्यंतचे घर सामान्य नागरीकांचे असते आणि तेथून पुढच जे घर असेल ते काही सामान्य नागरीकांच्या निवासाच छप्पर नसतं मग ते त्यांनी त्याच्या ऐशोआरामासाठी बांधलेल असेल आणि जर ते अवैध असेलतर निश्चितच त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे. परंतु आजचा हा निर्णय की एक हजार स्क्वे.फुटा पर्यंतच घर आपण अधिकृत ठरवाव त्याच मनापासून कौतूक. मला अजूनही आठवतं की जे काही विषय घडले आपले शहराध्यक्ष

मा. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी ज्या पक्षाशी संलग्न होते त्यांनी राजीनामा दिला या सगळया गोष्टीचा त्यांनी पाठपुरावा केला, त्याच्यामध्ये आपले मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस असतील त्यांनाही ते पटल की इथला सामान्य नागरीक, कष्टकरी नागरीक जो व्यावसायासाठी, नौकरीसाठी या पिंपरी चिंचवड शहरात येतो आणि इथे आल्यानंतर तो स्वत:च घरकुल बांधतो परंतु जे आतापर्यंत सत्तेत होते त्यांना हे जमल नाही, सामन्य नागरीकांच्या जिव्हाळयाकडे वळलेच नाहीत असा विषय याठिकाणी आज आपल्या पक्षाने मंजूर केला त्याबद्दल सगळयांचे मनापासून कौतूक करावस वाटत. मा.आमदार लक्ष्मणभाऊ असतील, मा.आमदार महेशदादा लांडगे असतील म्हणजे आमदार लक्ष्मणभाऊनी तर राजीनामा दिला होता फक्त सामान्य नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न होता त्यांच्या प्रश्नाला वाचा फुटली पाहीजे, त्यांना न्याय मिळाला पाहीजे म्हणून मला वाटत नाही की कोणी एक दिवस सुध्दा आपल्या खुर्चीवरुन खाली उतरायला तयार होतं परंतु एक वर्षाचा कार्यकाल त्यांनी सामान्य नागरीकांसाठी विना पदाचे राहीले. त्यांनी सांगीतले माझ पद मला याठिकाणी महत्वाचे नाही तर सर्वसामान्य नागरीकांचे प्रश्न महत्वाचे आहेत व त्यांना जोड मिळाली मा.आमदार महेशदादा यांची. या दोघांनी मिळून हा विषय प्रत्येकवेळेस मांडला, अनेकदा पाठपुरावा केला आणि यश मिळवल त्या यशामध्ये आपल्या सगळयांचा याठिकाणी असणारा बांधकामाचा प्रश्न एकदाचा तडीस निघाला. मला या ठिकाणी सांगताना आनंद होतो की हा प्रश्न या विषयामुळे फक्त पिंपरी चिंचवड शहरालाच नाहीतर संपुर्ण महाराष्ट्राच्या डोक्यावर असलेली टांगती तलवार जी होती ती निकाली निघालेली आहे आणि म्हणून पुन्हा एकदा आपल्या महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री सन्मा.देवेंद्रजी फडणवीस असतील, मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप असतील, मा.आमदार महेशदादा लांडगे असतील या तीघांचे मी मनापासून अभिनंदन करते आणि हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी मी विनंती करते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शास्तीकराचा जो निर्णय आहे त्याबाबत आज मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, मा.महेशदादा लांडगे या दोघाचे मी मनापासून अभिनंदन करते. ब-याच वर्षापासूनचा प्रलंबीत प्रश्न होता त्यांच्या प्रयत्नामुळे हा प्रश्न निकालात आला. शास्तीकराचा जो विषय आहे त्याच्यामध्ये आताच माई ढोरे यांनी उपसूचना मांडली एक हजार स्क्वे.फुट पर्यंत शास्तीकर माफ करावा. मा.महापौराना व मा.सत्तारुढ पक्षनेत्यांना विनंती आहे की गुंठेवारीमध्ये राहणारा जो वर्ग आहे कारण एक गुंठा म्हणजे जवळ जवळ ११०० स्क्वे.फुटा पर्यंतचा ऐरीया असतो तरी मला वाटत एक हजार स्क्वे.फुट न करता ११०० स्क्वे.फुट पर्यंतची शास्ती ही माफ करावी. आताच काही सभासदांनी मुद्दा मांडला. खरोखरच पिंपरी चिंचवड शहरामध्ये आताच सचिनभाऊ म्हणाले की ३३८३२ घर ही आता अनधिकृत शास्तीकरामध्ये लादली गेलीत. तीन ते चार महीन्यामध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये किती अनधिकृत बांधकाम चालू आहेत हे अधिका-यांना माहिती आहे का. आणि

जर शास्तीकराचा विषय आपण कुठल्या कुठल्या पध्दतीने निकालात काढत असूतर आता जी नवीन अनधिकृत बांधकाम होतात याला जबाबदार कोण राहणार आहे. याला जबाबदार नागरीक आहेत का प्रशासन अधिकारी आहेत. कारण जर अनधिकृत बांधकाम होतात तर त्यावेळेला आपले अधिकारी काय करतात या प्रश्नाच उत्तर आम्हांला हवं आहे. कारण शास्तीकराचा विषय ज्या पध्दतीने आपण आणण्याचा प्रयत्न करतो पण येथे कुठेना कुठे आपले प्रशासनही अनधिकृत घर पाडण्यासाठी जबाबदार आहे. या प्रश्नाने त्याचा बोध घ्यावा आणि अनधिकृत घरे या पुढे बांधली जाणार नाहीत याच्यावर त्यांनी निश्चितच विचार करावा एवढच बोलते.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आतापर्यंत जेवढे सदस्य बोलले, ६०० स्क्वे.फुटाच न करता १००० स्क्वे.फुटाच करा. काही म्हणाले सरसकट माफ करा. जर २०१५ पर्यंतची बांधकाम अधिकृत होणार असेलतर त्याला शास्तीकर लागू करुन घेण्यासाठी का हाट्ट धरला जातो. २०१५ पर्यंतची बांधकाम अधिकृत करण्यासाठी शासनाने देखील हायकोर्टात अफेडेव्हीट सादर केलं होत. दोन्ही सभागृहामध्ये निर्णय झाला की सर्व बांधकाम अधिकृत करायचे तर शास्तीकर का लागू करता. जर लागू केलातर व उदया लोकांनी भरला तर तो अधिकृत झाल्यानंतर परत करणार का. कारण समाविष्ट गाव होती त्यावेळेस या लोकांनी कर भरल्यानंतर निर्णय आला की कर भरु नका माफ केलेला आहे. मग तो कर परत दिलेला नाही.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी मी एकच सांगेल की या शहरामध्ये अर्धा गुंठा जागा असेलतर, मोठे कुटूंब असेलतर त्यांनी तीन मजले बांधलेतर तिथच १५०० स्क्वे.फुट होते. याठिकाणी कोणी एशोआरामासाठी घर बांधत नाहीत. ज्याच मोठ कुटूंब असत त्यालाच याठिकाणी मजले वाढवावे लागतात कारण तीन मुलं असतात, दोन मुल असतात त्याच कुटूंब वाढत असल्याच्यानंतर तो मजले वाढवतो एक हजार स्क्वे.फुटाचे पुढे असे किती घर अनधिकृत आहेत आणि एक हजाराच्या आतमध्ये किती आहेत. म्हणजे किती जणांना तुम्ही ही उपसूचना देऊन फायदा देतात आणि किती जणांना त्याठिकाणी नुकसान होते याची माहिती दयावी.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – पिं.चि.महापालिका हद्दीतील सर्व सरसकट अनधिकृत बांधकामाना शास्तीकर पुर्णपणे माफ करावा.

**मा. सुलक्षणा धर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय खरंतर आजचा शास्तीकराचा विषय मा.महापौर आपल्या काळात महापालिका सभेमध्ये आलेला आहे.

या शास्तीकराच्या विषयावर अनेक वर्षे जी गोरगरीबांच्या डोक्यावर टांगती तलवार होती ती टांगती तलवार दुर करण्याचे काम आपल्या शहराचे मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, मा.आमदार महेशदादा लांडगे त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी केले. याठिकाणी गोरगरीबांचा शास्तीकराचा विषय मार्गी लागतो. नक्कीच त्यांना हे पुण्यांच काम केलं आहे, गोरगरीबांचे अशिर्वाद त्यांना लागणार आहे. कारण अनेक वर्षे या लोकांचे ज्यांनी अर्धा, एक गुंठा जागा घेवून घर बांधलेले आहेत बाहेरुन लोक आलेली आहेत अर्धा गुंठा, गुंठा जागा घेऊन त्यांनी घर बांधली. काही लोकांनी घरातल्या बायकांच्या गळयातील मंगळसुत्र मोडून पैसे नसताना घर उभे केलेले आहे आणि त्या घरामधुन हे जे काही पुढचे प्रश्न उपस्थित झाले ते आज याठिकाणी मार्गी लागत आहेत. मा.महापौर साहेब, आपल्या काळात चांगले काम होताना आता उपसूचना माई ढोरे यांनी मांडली की एक हजार पर्यंत माफ करावा. आता सांगीतले की मजल्यावर मजले वाढविले की १५०० स्क्वे.फुट होते. मला एवढेच सांगायचे आहे की आता जो विषय होता ६०० स्क्वे.फुट बांधकामाला शास्तीकर माफ परंतु याठिकाणी पिंपरी चिंचवड शहरात सर्व नागरीक आपले आहेत आपण ६०० स्क्वे.फुट न करता एक हजार स्क्वे.फुटा पर्यंत माफीचा हा विषय मंजूर करावा. माई ढोरे यांच्या उपसूचनेला अनुमोदन राहील.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता माई ढोरे यांनी सांगीतले एक हजार स्क्वे.फुटापर्यंत. माझ्या माहितीनुसार पुर्वी जे जे लोकांनी एक ते दिड गुंठा जागा घेतलेली आहे त्यांचे एक हजार स्क्वे.फुटापेक्षा जास्त स्क्वे.फुट होतात. गुंठयानुसार केलेतर सर्व नागरीक बसतील. त्याचप्रमाणे ६०० ते १००० स्क्वे.फुट अधिकृत करणार आहोत परंतु आपल्या अधिका-यांनी शहरातील पुर्ण लोकांच्या नोंदी केलेल्या आहेत का. निम्म्या सुध्दा नोंदी लोकांच्या घराच्या केलेल्या नाहीत. घराच्या नोंदी करण्यासाठी नागरीक वेळोवेळी जातात एक एक नागरीक शंभर शंभरवेळा फे-या मारतो परंतु त्या लोकांना अधिकारी फिरवतात, आज या उदया या. माप घेतल्यानंतर चार महिने, सहा महिने, वर्षभर सुध्दा नोंदी होत नाहीत. आपण सर्व अधिका-याना आदेश दयावेत की नागरीकांच्या नोंदी लवकर करुन त्यांना लवकरात लवकर टॅक्स मिळावा. लोकांना कधीच टॅक्स पावत्या वेळेवर मिळत नाहीत. प्रत्येक वेळेस नागरीक तिथ जातात, टॅक्सपावत्या काढून घ्यायच्या त्या सुध्दा काढण्यासाठी यांच सॉफ्टवेअर कधी बंद असत कधी कॉम्प्युटर बंद असतं. मग नागरीकांनी करायच काय. यात सुध्दा आपण लक्ष घातले पाहीजे. जेणेकरुन नोंदी असतीलतर आपल्याला हे पुढचे करणे एकदम सोप जाईल. शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. दोन्ही आमदारांचे मी कौतूक करते.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी मा.महापौर साहेबांना विनंतीवजा सूचना करतो की आता आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध नसेल ती आकडेवारी ही जीआयएस मॅपिंगव्दारे प्रॉपर्टीची आकडेवारी घ्यावी व शहरामध्ये किती बांधकाम

झाले याच पुर्णपणे डाटा हा जीआयएस मॅपिंगव्दारे मिळेल. तरी आपण प्रशासनाला आदेश दयावेत की जीआयएस मॅपिंग करुन घेण्यात यावी अशी मी आपणास विनंती करतो, धन्यवाद.

**मा.प्रविण भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी शास्तीकराची माहिती दिलेली आहे. ६०० ते १००० स्क्वे.फुट असेल. मला याठिकाणी विचारायचे आहे की आपल्या पुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये काही भाग हा रेडझोनमध्ये येतो. आमचा संपुर्ण प्र.क्र.१२ असेल हा रेडझोन अंतर्गत आहे आणि भोसरीचा काही भाग रेडझोनमध्ये येतो. यामध्ये रेडझोनमधील घराना याचा काहीच फायदा होणार नाही. त्यामुळे आमची अशी विनंती राहील की रेडझोन मधील भागातील रहिवाशातर्फे विनंती राहील हा शास्तीकर पुर्णतः रद्द करावा तरच या घरांना फायदा होईल.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय गेल्या अनेक वर्षापासून आपल्या शहरामध्ये आपल्या सर्वांना भेडसावतो आहे. मला वाटते या सभागृहातील सर्व नगरसेवकांना हीच अपेक्षा आहे की १०० टक्के शास्तीकर हा रद्द झाला पाहीजे. त्यादृष्टिकोनातून आपण सर्वजण सातत्याने प्रयत्न करत आलेलो आहोत. मागच्या काळात सुध्दा आपण सगळयानी त्या संदर्भात प्रयत्न केले. त्या त्या वेळेसच्या सर्व लोकप्रतिनिधीनी त्या संदर्भात प्रयत्न केले. निवडणूकीच्या निमीत्ताने आपण जेव्हा निवडणूकीला सामोरे गेलो तेव्हा प्रत्येकानी नागरीकांना आश्वासन दिले की १०० टक्के या शहरातील बांधकाम नियमीत करु. १०० टक्के शास्तीकर रद्द करु. अशाप्रकारच्या भावना व्यक्त केल्या आणि लोकांनी आपल्यावर विश्वास ठेवून लोकप्रतिनीधी म्हणून काम करण्यास संधी दिली म्हणून आज आपण सर्वजण याठिकाणी सभागृहात आहोत. एक गोष्ट निश्चित चांगली आहे की शासानाने या संदर्भातील प्रयत्न केला आहे. परंतु हे करत असताना माझी विनंती आहे की हा जो प्रयत्न आहे तो ६०० स्क्वे.फुटाचा आहे आणि माई ढोरे यांनी १००० स्क्वे.फुटा पर्यंतचा हा विषय याठिकाणी उपसूचनेव्दारे माफ करण्याची भुमीका याठिकाणी मांडली. परंतु १००० स्क्वे.फुटाच्या पुढे सुध्दा खुप मोठया प्रमाणात घर आहेत. मला वाटत मगाशी शेंडगेताईनी एका गोष्टीचा उल्लेख केला की, १००० स्क्वे.फुटाच्या पुढे ज्यांचे बांधकाम आहेत ते मोठे लोक आहेत परंतु ताई तसं नाही आपण जर प्रत्येकानी आपआपल्या प्रभागातला खरच सर्वे केलातर कुठल्या लोकांनी त्याठिकाणी मोठी बांधकाम केलेली आहेत की ज्यांची कुटूंब मोठी झालेली, त्यांची आर्थीक परिस्थिती, नुसत्या एका मुलाने नौकरी करुन भागत नाही म्हणून त्याठिकाणी काही लोकांनी दोन-चार खोल्या बांधुन भाडयाने दिलेल्या आहेत आणि त्या भाडयाच्या उत्पन्नावरती त्यांच कुटूंब चालतं अशा लोकांनी हे बांधकाम केलेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे जवळपास ९० टक्के बांधकाम ही अशी आहेत की जी सर्वसामान्य माणसान केलेली आहेत. त्याच्यामुळे माझी आपल्याला अशी विनंती आहे की आपण याच्यामध्ये

दुजाभाव न करता सगळयांना एकाच न्यायान पाहील पाहीजे आणि हा जो काही शास्तीकर आहे तो १०० टक्के शास्तीकर सगळयांसाठी माफ केला पाहीजे यादृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहीजेत. दुसरी गोष्ट मुळात हा शास्तीकर लावण्याचा जो विषय समोर आला याच्या मागची भुमिका अशी होती की येथून पुढच्या काळा मध्ये म्हणजे जेव्हा गुंठेवारी कायदा आला तेव्हा १०० टक्के सगळया महाराष्ट्रातील बांधकाम नियमीत करण्यात आली. अशी अपेक्षा होती की येथून पुढच्या काळामध्ये लोकांनी अधिकृत घर बांधावे परंतु प्रत्यक्षात ते होऊ शकलेले नाही. त्याच्या मागचे कारण काय तर आपल्या येथे जी बांधकाम नियमावली आहे त्याच्यामध्ये अनेक कटकटी आहेत. सर्वसामान्य नागरीक प्लॅन पास करायला गेलातर त्याला खुप त्रासाला सामोरे जावे लागते. मी मागच्या आयुक्तांनाही याठिकाणी विनंती केली की आयुक्त साहेब, तुम्ही सुध्दा एखादा छोटासा प्लॅन मंजूर करण्यासाठी टाकावा त्यावेळेला तुम्हाला सुध्दा लक्षात येईल की काय परिस्थितून जाव लागत. त्याच्यामुळे इतक्या कटकटीचे आहे. सर्वसामान्य माणूस प्लॅन मंजूर करायला जातो आणि त्याला ज्या कटकटी आणि जो वेळ लागतो, पैसा लागतो त्याच्यामुळे त्याची माणसीकता अशी झालेली आहे की बेकायदेशीर बांधकाम केलेल परवडेल कारण सगळेच लोक बेकायदेशिर बांधकाम करतात तर मी का करु नये अशाप्रकारची भावना आणि भूमीका त्या नागरीकांची होत असते. याठिकाणी सुजाताताई म्हणाल्या की प्रशासनाची याच्यामध्ये चुक आहे, निश्चितपणे प्रशासनाची चुक आहे परंतु लोकप्रतिनीधी आणि आपण सर्वजण यामध्ये जबाबदार आहोत. शेवटी बांधकाम होत असताना त्या सगळया गोष्टीला सर्वचजण जबाबदार आहेत त्यामुळे ही सगळयांनी जबाबदारी घेऊन येथून पुढच्या काळात अनधिकृत बांधकाम सगळी कडे चालू आहेत ती थांबवायचीच असेल त्या प्रश्नाच्या मुळाशी आपल्याला जायच असेलतर १०० टक्के बांधकाम अधिकृत करण्याच्या दृष्टिने पाऊल उचलली पाहीजेत त्यादृष्टिकोनातून शासनस्तरावरती आपले लोकप्रतिनीधी प्रयत्न करतात. त्याच बरोबर नवीन लोकांना बांधकाम परवानगी घेताना त्याच्यामध्ये जी नियमावली आहे त्यामध्ये बदल केला पाहीजे. आज ती बांधकाम नियमीत करण्यासाठी ज्या अडचणी शासनापुढे येतात, मागच्या शासनाच्या पुढे काही अडचणी आलेल्या होत्या त्याच्या मागच मुख्य कारण आपल्या सगळयांना माहीती आहे की साईड मार्जीन सोडले गेलेल नाही, एफएसआय जो पर्सीबल आहे त्याच्यापेक्षा जास्त काही ठिकाणी एक, दोन, तीन, चार इतका एफएसआय वापरला गेलेला आहे. याच्यामुळे शासन निर्णय हे कोर्टात टिकत नाहीत उदयाच्या काळामध्ये एखादा अधिकृत बांधकाम करणारा माणूस कोर्टात गेलातर निश्चितपणे त्याच्या विरोधात कोर्टात निकाल जाऊ शकतो त्यामुळे शासनाला हा निर्णय घेण्यास अवघड जात. त्यामुळे माझी आपणा सगळयांना विनंती आहे की आपण येथून पुढच्या काळामध्ये हा निर्णय जर लावायचा असेलतर या शहरामध्ये किंबहुना महाराष्ट्रामध्ये याच्यासाठी सर्व ठिकाणी अधिकचा एफएसआय दयावा लागेल, काही साईड मार्जीनमध्ये रिलॅक्सेशन दयाव लागेल तरच येथून पुढच्या काळामध्ये लोक

अधिकृत घर करतील किंवा त्यांना जे अपेक्षीत बांधकाम आहेत ते करतील आणि त्याच्यानंतरच ख-या अर्थान या शहरात नियोजनबध्द काम होईल. या शहरातील जी काही आरक्षण आहेत ती मोकळी आहेत ती ताब्यात घेतली जातील. ट्रॅफिकची मोठी समस्या या शहरात जाणवते. भविष्यकाळामध्ये अधिक जास्त ट्रॅफिकचा प्रॉब्लेम संपूर्ण शहरात होणार आहे त्याच्या मागची कारण वाढती लोकसंख्या आणि प्रत्येकाकडे वाढत्या गाडया आहेत. याच्यामुळे रस्त्याची गरज भासणार आहे. या शहरात आपण सगळयात चांगले रस्ते केले आहेत परंतु ते करुन सुध्दा आज भागत नाहीत. उदयाच्या काळामध्ये सगळे शहरातील रस्ते विकसीत करावे लागणार आहेत. त्यामुळे हा जो काही अधिकचा एफएसआय हा पर्याय आपल्याला पुढे आणावा लागेल. माझी विनंती आहे की या प्रश्नाकडे आपण वेगळया पध्दतीने पाहीले पाहीजे. सर्वच पक्षाच्या लोकांना माझी विनंती आहे की आपण या विषयाचे राजकारण न करता हा विषय गोरगरीबांचा, कामगारांचा, सर्वसामान्य माणसाच्या हिताच्या दृष्टिने सरसकट सर्व बांधकामाना शस्तीकर माफ करावा अशा पध्दतीने मंजूर करावा अशी माझी अग्रहाची मागणी आहे, धन्यवाद.

**मा.ॲड.सचिन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शास्तीकराचा हा प्रश्न पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरीकांच्या अगदी जिव्हाळयाचा प्रश्न आहे. अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत होता तो या सभागृहात आज आला. मी प्रथमत: आपल्या सर्वाचे याठिकाणी मनापासून अभिनंदन व्यक्त करतो. या प्रश्नावरती शास्तीकराच्या मुदयावरती या अगोदर अनेक निवडणूका लढवल्या गेलेल्या आहेत. अनेकवेळा वेगवेगळे आश्वासन या मुद्दयावर देण्यात आलेली होती. माझी सभागृहाला विनंती आहे की सभागृहाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने हे जे नियम लादलेले आहेत ६०० स्क्वे.फुट किंवा १००० स्क्वे.फुट याच्यामध्ये क्लासीफिकेशन काय आहे, याच्यामध्ये विभागणी कशी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपण नियमीत करणार असालतर १०० टक्के हा शास्तीकराचा प्रश्न सुटला पाहीजे आणि १०० टक्के हा शास्तीकर माफ झाला पाहीजे. परंतु हे करत असताना मला असे वाटते की ज्यावेळेस आपण ६०० आणि १००० स्क्वे. फुटाच एखादया व्यक्तीच घर नियमीत करतो त्याचा शास्तीकर माफ करतो तर दुसरा व्यक्ती त्याच्यापेक्षा जास्त बांधकाम करतो त्याला तुम्ही कस करणार आहेत या दोन्हीच क्लासीफिकेशन आणि माहिती मिळणे महत्वाचे आहे त्यामुळे कुठल्याही समाजावर, कुठल्याही घटकावर अन्याय होता कामा नये अशा पध्दतीने निर्णय घ्यावा. शास्तीकर १०० टक्के माफ व्हावा याच मताशी आम्ही आहोत एवढच बोलतो आणि थांबतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. येथे बसलेल्या प्रत्येकाच्या मनामध्ये कुठतरी खदखद, कुठतरी दु:ख आहे की आपल्याला हवा असलेला निर्णय

आपण घेऊ शकलो नाही. मा.आमदारांचे, मा.मुख्यमंत्र्याचे कौतूक झालेतरी सुध्दा त्यातन खदखद मात्र सर्वाच्या मनामध्ये आहे. भारतीय जनता पक्षाचे शासन आहे त्याच्या अनुषंगाने त्यांच्या पदाधिका-यांनी हे मान्य केलेले आहे की उपसूचनेव्दारे का होईना परंतु जे सत्य आहे ते सत्य मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक पाहता ६०० स्क्वे.फुटाच्या घराला माफी बाकीच्या एक पट दुप्पट आहे. याठिकाणी हा विषय नसुन परिपत्रक आहे याचे अवलोकन करायचे आहे. राज्यशासनाने परिपत्रक काढल आहे त्याच अवलोकन करायच आहे. हे करत असताना येथून मागे महापालिकेमध्ये निर्णय घेतलेला होता त्यावेळेस आघाडीचे शासनाच्या वेळेस त्यांनी तो आपला विषय विखंडीत केला. आणि दुप्पट शास्तीकर वसुल करावा असे आदेश दिले गेले. मग ते २००८ पासून लावाव का कस लावाव ते पत्र येईपर्यंत आपण पत्रकात नोटीस देईपर्यंत मग रिट्रॉस्पेक्टीव्ह आपल्याला वसुल करता येत नाही मग त्यामध्ये परत वाद काढत काढत आपण २०१२-१३ पासून लागू करुन त्यांच्याकडन वसुली चालू केली. त्यावेळेसच्या सत्तेमध्ये असणारी लोक, कोणाचीही मानसीकता नव्हती आणि आजही ती मानसीकता नाही. कोणालाही अस वाटत नव्हत की अवैद्य बांधकाम तोडावे किंवा त्याला लवकर न्याय मिळावा आणि शास्तीकर रद्द व्हावा यादृष्टिने सर्वांचे प्रयत्न होते. दि. १२/१/२०१५ साली आपण परिपत्रक काढले आणि कॉम्प्युटरमध्ये काही चेंजेस केल्या त्यामध्ये आपल्याला शास्तीकर वेगळ करुन रक्कम स्विकारता येत नव्हती. त्या सॉफ्टवेअरमध्ये आपण बदल करुन फक्त आपण रेग्युलर जो टॅक्स आहे तो वसुली सुरु केली. कारण आपला जो टॅक्स आहे तो सुध्दा हायपर होत होता. यासाठी सुवर्णमध्य काढून लोकांकडून कर वसुल करायची शास्ती बाजूला ठेवायची अशा पध्दतीने आपण ते १२/१/२०१५ ला परिपत्रक काढल. दरम्यानच्या काळामध्ये आम्ही आमच्या सत्तेमध्ये असताना आम्ही खुप प्रयत्न केले, आम्हांला अपयश आले ते आम्ही मान्य करतो. त्यानंतर आमदारांनी प्रयत्न केले, त्यांचे असे प्रयत्न होते की अधिवेशना मध्ये व्हाव. अधिवेशनाच्या अगोदर व्हाव, ब-याचवेळेस त्यांनी सांगीतल की झाल झाल, आता परिपत्रक निघतय, उदया होणार आहे, परवा होणार आहे. असं करता करता शेवटी ज्यावेळेस मुख्यमंत्री पिंपरीमध्ये आले आणि मुख्यमंत्र्यांनी दि. ११/१/२०१७ च परिपत्रक जाहीर केले आम्ही आयुक्तांना, प्रशासनाला विचारलेतर ते म्हणाले असे काही परिपत्रक आलेले नाही. पत्रकारानी विचारले नंतरच्या काळात मा.मुंख्यमंत्री पिंपरी चिंचवडला आले होते त्यांनी सांगीतले की अशा पध्दतीच परिपत्रक आम्ही अपलोड केले, अपलोड करताना त्यामध्ये काही तांत्रीक अडचण आली. ते अपलोड झाल नाहीतर ते डाऊनलोड कधी होणार. डाऊनलोड झाल नसल्यामुळे त्याची माहिती आलेली नव्हती. दरम्यानच्या काळात काहीतरी शास्तीकराचा निर्णय घेतला त्याबद्दल मा.देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. परंतु आज आपण पाहतो की नेमक ६०० स्क्वे.फुटाच म्हणजे किती लोकांना दिलासा देणार आहे. आज या सभागृहामध्ये जे जे सभासद प्रतिनीधीत्व करतात त्या सगळयांची वेगळी अडचण आहे आणि आतातर आपण

प्रभाग पध्दत अशा पध्दतीची केलेली आहे की सर्व प्रकारची लोक त्या त्या प्रभागामध्ये आहेत. सर्वांना हा प्रॉब्लेमेटीक विषय आहे. ६०० स्क्वे.फुटाच घर असलेली लोक किती आणि किती लोकांना आपण न्याय देणार आहोत. नंतरच्या लोकांना हजार स्क्वे.फुटा पर्यंत आणि त्याच्या पुढच्या लोकांना दुप्पट. याच्यामध्ये अनेक प्रश्न आहेत. हा शास्तीकर लावताना नेमका किती फुटावर लावणार, कोणत्या तारखेपासून लावणार, मुळ बांधकाम किती होते अधिकचे बांधकाम कधी झालं, त्यांनी कधी बांधकाम केले, तुमच्या रेकॉर्डवर कधी आल. तुम्ही शास्तीकर कधी लावला. आमचे सहकारी प्रमोद कुटे यांनी प्रश्न मांडला, गावडे साहेबांनी आणि शिंदे साहेब, आताच दरम्यानच्या काळात मध्ये पेपरला बातमी आलेली होती दोन्ही सभागृहामध्ये अनधिकृत बांधकामा बद्दल मंजूरी मिळाली आणि २०१५ पर्यंतचे बांधकाम रेग्युलर होणार. अशा पध्दतीच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रातून आलेल्या होत्या. आमचे सहकारी कुटे यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अतीशय योग्य आहे. पहील्यांदा एखादा विषय न्यायप्रविष्ठ असतो त्यावेळेला त्याच्यावर आपण भाष्य सुध्दा करत नाहीत. आता हा अनधिकृत बांधकामाचा विषय न्यायप्रविष्ठ असताना आपण शास्तीकराचा निर्णय घेतो हा कायदयाच्या दृष्टिने कितपत योग्य आहे हे तपासून बघण्याचा विषय आहे. म्हणजे एखादा विषय न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे आणि आपण त्याच विषयावर अशा पध्दतीच शास्तीकर वसुल करावा किंवा नाही करावा हा सुध्दा कायदयाच्या तज्ञांकडून विचारुन घेण्याचा प्रश्न आहे. २०१५ पर्यंत शासन मंजूरी देतच आहे आणि ती मंजूरी करत असताना त्याला काहीतरी आपण प्रिमीएम घेणार आहोत. म्हणजे दोन दंड होणार आहेत का. एखादया गुन्हयाला एकच शिक्षा होते. आज तुमच्या ट्रेझरीमध्ये शास्ती कराच्या रुपाने पैसे जमा झाले आणि उदया दोन महीन्यानंतर असा निर्णय आला एवढ एवढ प्रिमीअम भरा आणि रेग्युराईज करा. की जस आता अजीत गव्हाणे यांनी सांगीतले की सामायीक अंतर बसल पाहीजेत, काही ठिकाणी सामायीक अंतर नाही, फ्रंट मार्जीन नाही, हाईट जास्त आहे असे अनेक त्याच्यामध्ये प्रश्न असताना नेमका आपण हा निर्णय कोणासाठी घेतला, यातून कोणाची सूटका होणार आहे. आणि एवढी जबरदस्त शास्ती आहे ती शास्ती मुळात रद्दच व्हायला पाहीजे. आमची मागणी आहे की शास्ती रद्द करा, उलट कोर्टाचा निर्णय येईपर्यंत थांबा किंवा राज्याशासनाने निर्णय घेतला असेलतर त्यांच अभिनंदन. परंतु एकाच गुन्हयासाठी दोनवेळा शिक्षा होऊ शकत नाही. दोन दंड होऊ शकत नाहीत. आमच म्हणण असं आहे की आपण शास्तीकर अधिक वसुल करता आणि तो सुध्दा प्रत्येक वर्षाला वसुल करतो त्यामुळे तो रेग्युलराईज होतो पुन्हा कशाला प्रिमीअम घेणार, घेणार असालतर आमची अशी विनंती आहे की मा.महापौर साहेब, जर तुम्ही निर्णय २०१५ पर्यंतचा घेतला आहे मग तुम्ही ३१ मार्च २०१७ पर्यंत घ्यावा आणि दुस-या बाजूला तुम्ही प्रशासनाकडे शब्दामध्ये वॉर्निंग दया की कोणत्याही परिस्थितीमध्ये याच्यापुढे अनधिकृत होणारी बांधकाम याला जबाबदार प्रशासन असणार आहे मग त्याला कुठल्याही प्रकारची सुटका नाही. शासन निर्णय २०१५ पर्यंत

घेततर मग हे ३१ मार्च २०१७ पर्यंत घ्या. २०१५ पर्यंत निर्णय घेतलाच असेलतर कारण काहीतरी प्रिमीअम भरुन रेग्यूलराईज करणार असालतर आणि ते रेग्युलराईज नियमात बसत नसेलतर त्या लोकांकडून वेगळा दंड घ्यावा हे आम्ही समजू शकतो. परंतु एका बाजूला कायदयाच्या चौकटीमध्ये बसत असताना त्यांना न्याय देत असताना तुम्ही त्याला दंड लावत असाल तर पुन्हा तुम्ही त्याला दंड लाऊन शिक्षा करु शकत नाहीत. म्हणून आमची विनंती आहे की तुम्ही प्रिमीअम जर घेत असालतर मग शास्ती नको आणि अशा लोकाला जी शास्ती लादलेली आहे शास्तीकर पुर्णपणे रद्द व्हावा अशा प्राकरचा ठराव आपल्याकडून मा.मुंख्यमंत्री यांच्याकडे पाठवावा आणि त्यावर राज्यशासनाने फेरविचार करावा अशा प्रकारची आम्ही सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारतीय जनता पार्टीच्या सरकारने मा.मुख्यमंत्री असतील, पिंपरी चिंचवड शहरातील दोन्ही आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप आणि मा.महेशदादा लांडगे या दोघांचेही मी अभिनंदन करते. या प्रकारचा निर्णय राज्यशासन घेते. मला वाटते संपुर्ण महाराष्ट्रात हा नियम लागू होणार आहे. आणि अशा प्रकारचे चांगले आणि गोरगरीबांच्या हिताचे निर्णय घेणारे हे सरकार म्हणून या सरकारच्या पाठीशी उभे राहणे तुमच माझ या शहरातील, या राज्यातील प्रत्येक नागरीकांच कर्तव्य आहे असं मला वाटतं. २००८ ला ज्यावेळेस दुप्पट शास्ती आमच्या या शहरावरती लादली गेली त्यावेळेला तेवढयाच पोटतीडकीने, तेवढयाच तत्परतेने मांडणारे आम्ही त्यावेळेस पासून आजपर्यंतचा हा विषय या सभागृहात वारंवार कुठल्या ना कुठल्या स्वरुपामध्ये येतो. त्यावेळेस सुध्दा अनेक आश्वासन इलेक्शन आल्यानंतर मिळत होती आणि या शहरातील प्रत्येक नागरीकांना वाटत होत की माझी आता शास्तीकरातून सुटका होणार आहे, पण ती काही सुटका झाली नाही हे सत्य आहे आणि हे कोणी नाकारु शकत नाही. गेल्या अनेक दिवसापासुन आशाताईने सांगीतले लक्ष्मणभाऊनी एक वर्षे आदि राजीनामा दिला, मला वाटत लक्ष्मणभाऊ भारतीय जनतापार्टीचे आमदार झाले, महेशदादा आमदार झाले त्यावेळेस पासूनच्या ते आतापर्यंतच्या अधिवेशनात पाहील असेलतर ते सभागृहामध्ये अनधिकृत बांधकाम अधिकृत करा म्हणून त्यांनी आणलेले वेगवेगळे विषय असतील, ठराव असतील त्यासाठी त्यांना झगडावे लागले असेल. लोकप्रतिनीधी म्हणून त्यांनी त्यांची भुमीका चोखपणे पार पाडलेली आहे. खरेतर नवीन सदस्यांनी चांगले मुद्दे मांडले त्यांच्या मुद्दयांच याठिकाणी स्वागतही व्हायला पाहीजे परंतु एखादी गोष्ट आपण चुकत गेलो की आपण किती चुकायचं याला सुध्दा मर्यादा पाहीजे. चुका चुका आणि चुका मग चुका करायच्या राजकारणातून चुका हा पायंडा कुठेना कुठेतरी एक दिवस थांबवावाच लागणार आहे आणि म्हणून दि.१२/१/२०१५ ही तारीख योग्य आहे. या पुढचा कुठलाही आदेश शासनाला सुध्दा देऊ नये. २००८ पासून शास्तीकर लागु झाला त्यावेळेला आपण ८५ कोटी वसुल केलेले आहेत. बांधकाम छोटे मोठे

अनधिकृत आहे त्याला शास्तीकर वसुल केलेला आहे. आता जो उपसूचनेव्दारे आपण निर्णय करतो तो निश्चितपणे या पार्टिचे सर्वेसर्व या शहराचे आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप व मा.महेशदादा लांडगे या दोघांनी सांगीतलं की आपल्याला या शहरातील नागरीकांना अनधिकृत या शब्दामधुन आम्हांला मुक्त करायचे आहे. आता जो काही ते दंड भरणार आहेत तो दंड सुध्दा ६०० ते १००० स्क्वे.फुटा पर्यंत कुठल्याही नागरीकांना तो दंड लागू नये तशी तुम्ही उपसूचना दया म्हणून त्यांनी आम्हांला याठिकाणी सुचना केल्यात आणि तशा प्रकारची उपसूचना आम्ही या सभागृहात मांडलेली आहे. याठिकाणी महाराष्ट्र शासनाने एमआरटीपी कायदयामध्ये सुध्दा बदल होतो त्याच्यामध्ये जो बदल अपेक्षीत आहे तो केलातर अनधिकृत हा शब्दच निघून जाणार आहे. २०११ पर्यंत करा २०१२ पर्यंत करा, २०१५ पर्यंत करा असं होणार असं आता किती दिवस आपण पुढे लांबवणार आहोत. नवीन बांधकाम नियमावली छोटया प्लॉटसाठी अस्तित्वात आलेली आहे. सुटसूटीत बांधकाम नियमावली सुध्दा सभागृहापुढे येणार आहे. त्याच सुध्दा आपण स्वागतच करायला हवं. मला मान्य आहे कोणालाही अनधिकृत घरात रहायला आवडत नाही परंतु जे काही अनावधाने झालेले आहे ते कुठेतरी स्टॉप करण्याची वेळ सुध्दा आता आलेली आहे. एकीकडे सलग सत्ता असताना जे निर्णय झाले नाहीत आणि आता वर्षभरातले निर्णय समोर येतात त्याचे कौतूक करणे सुध्दा निश्चितपणे तीतकच गरजेचे आहे. याठिकाणी अजीत गव्हाणे यांनी खुप चांगले विचारलेले आहे. अधिकृत बांधकाम केलतर आणि कोर्टात गेलतर काय. असेच काही महाभाग कोर्टात गेले आणि त्यांनी ते लादलं. घर स्वत:साठी करतात आणि स्वत:च्या बायकोला कोर्टामध्ये पिटीशनर करतात. जरी असा कोणी अधिकृत कोर्टात गेलातरी  राज्य शासनाला विधीमंडळात कायदा करण्याचा निश्चितपणे अधिकार आहे आणि तो कायदा येणार त्यासाठी माझ्या मनामध्ये तीळमात्र सुध्दा शंका नाही. यानंतरच्या बांधकामाच काय होणार, पुढच्या बांधकामाचे काय होणार. बांधकामाच्या संदर्भामध्ये निश्चितपणे शासन अनुकूल आहे. शासनास निर्णय घ्यायचा होता परंतु कोर्टात असल्यामुळे, तो निर्णय आपण घेणार आहोत. आपण शास्तीकराच्या संदर्भात बोलतो. मग शास्तीकर परत करणार का, कसा देणार, का देणार, शासनाच्या तीजोरीत पैसे आलेतर परत जाणार का यामध्ये आपण सुध्दा चांगले अभ्यासकर्ते आहात त्यामुळे मी जास्त काही बोलणार नाही. परंतु काही सुचना केलेल्या आहेत त्या सुचनांच निश्चितपणे पालन व्हाव. उत्तम केंदळे सारखे प्राध्यापक या सभागृहात आहेत त्यांनी चांगली संकल्पना मांडलेली आहे. जीआयएस मॅपींगव्दारे आपण सर्व मिळकतींच मॅपींग कराव. जेणे करुन कोणी किती बांधकाम केलं हे सुध्दा आपल्याला माहित होईल. गरजेपेक्षा जास्त जे लोक बांधकाम करत असतीलतर त्यांना माफी देऊ नये या मताची मी आहे. बांधकाम कुठल्याही झोनमध्ये असेलतर ते माफच होणार आहे. ६०० ते १००० स्क्वे.फुटापर्यंत कुठल्या क्षेत्रातील असलेतरी माफीचा विषय आहे. आम्ही राज्यशासनामध्ये असल्यामुळे पाठपुरावा करणार आहोत की तो सुध्दा माफ व्हावा

म्हणून. न्यायप्रविष्ट असताना हे आपण करु शकतो का, शास्तीकरामध्ये निश्चितपणे आपण माफी देऊ शकतो. जी उपसूचना दिलेली आहे ती स्विकारावी त्याचप्रमाणे दोन्ही आमदार, मा.मुख्यमंत्री असतील भारतीय जनता पार्टीचे जे जे लोक हा निर्णय घेण्यामध्ये सामील असतील त्यांचे मी अभिनंदन करते आणि थांबते, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दत्तात्रय साने यांनी या विषयाची सुरवात केली. शास्तीकर म्हणजे ख-या अर्थाने जिझीया कर आणि हा कधी पासून चालू झाला. २००८ पासून शास्तीकराची व्याप्ती सुरु झाली. अनधिकृत बांधकामा संदर्भात माझ्या अगोदरच्या सगळयां वक्त्यांनी बोलताना सांगीतले की अनियमीत बांधकाम. मा.नामदेव ढाके साहेब इथे आहेत. या राज्याचे मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अनियमीत बांधकामाच्या मोर्चाला याठिकाणी आले होते. मला अस वाटत की या प्रश्नाचे राजकीय भांडवल भारतीय जनता पार्टी म्हणून आम्ही कधीच करणार नाहीत. कारण याच प्रश्नावर या महापालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार आले. खरंतर हे सरकार या राज्यामध्ये सत्तेमध्ये आलं, हे सरकार केंद्रामध्ये सत्तेमध्ये आलं, लोकांची काम करण्यासाठी सत्तेमध्ये आलं. सगळयाच वक्त्यांनी बोलता बोलता हे १०० टक्के सांगीतले की शस्तीकराची माफी झाली पाहीजे. मला असं वाटत की तेवढयाच मनान या सरकारच विशेषत: मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप असतील, मा.आमदार महेशदादा लांडगे असतील यांचे जर अभिनंदन केल असततर मला अधिक आनंद झाला असता. कारण या सरकारने सत्तेच्यामध्ये आल्याच्यानंतर कायम लोकांसाठी चांगले निर्णय घेण्याचा प्रयत्न केला. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये दोन दोन वेळा कोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल केलं आणि त्याच्यामधुन सर्वसामान्य माणसाना न्याय मिळावा अशा प्रकारची भुमिका घेतलेली आहे. दुर्दैवाने कोर्टाच्या पुढे काही नाही झालं. परंतु १ जानेवारी २०१७ साली या शास्तीकराच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे राजपत्र प्रसिध्द झाले. ६०० स्क्वे.फुटा पर्यंतच्या घराला शास्तीकरातून माफी मिळाली पाहीजे. फेब्रूवारी २०१७ ला महापालिकेचा निकाल झाला आणि आचारसंहिता लागण्याच्या अगोदर मा.मुख्यमंत्री यांनी जो शब्द दिला तो मा.मुख्यमंत्री यांनी हा शब्द पाळला आहे आणि ८ जानेवारी २०१७ ला नोटीफिकेशन काढलेले आहे. आम्ही जे बोलतो ते करतो. या शहराचे अध्यक्ष मला वाटत की त्यावेळेस वेगळया पक्षामध्ये होते आणि त्यांची सत्ता या महापालिकेमध्ये मागच्या काळामध्ये होती. राज्यामध्ये त्यांची सत्ता होती, केंद्रामध्ये यांचच सरकार होते. या सर्वसामान्य शहरामधल्या माणसाला अनधिकृत बांधकामाच्या जोखडामध्ये डांबून टाकण्याचे काम तुम्ही सगळयांनी केल आणि हा शास्तीकर नाहीतर हा जिझीयाकर सर्वसामान्य माणसावर लादला. या राज्यामध्ये आमची सत्ता आल्याच्यानंतर आम्ही मनापासून ठरवल या शहराचे अध्यक्ष मा. लक्ष्मणभाऊ जगताप असतील, महेशदादा लांडगे असतील हे पहील्या दिवसापासून पहील्या अधिवेशानामध्ये कारण मी विधानसभा लढलो आणि विधानसभा हारलो त्यावेळेस पहील्या

अधिवेशनाला मी ज्यावेळेस गेलो त्यावेळेस विधानसभेच्या अधिवेशनामध्ये पहीला प्रश्न कुठला असेलतर अनधिकृत बांधकाम नियमीत झाले पाहीजे हा होता. लोकांना न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न करतो आणि लोकांना ज्यावेळेस न्याय देण्याचा प्रयत्न करतो त्यावेळेस कुठल्याही पध्दतीचे राजकारण करत नाहीत. एखादी चांगली गोष्ट झालीतर त्याचे क्रेडीट सुध्दा शंभर टक्के मिळाले पाहीजे. ६०० स्क्वे.फुटा पासून १००० स्क्वे.फुटापर्यंत न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न केला. माझ्या अगोदर योगेश बहल यांनी सांगीतल खरं आहे की ८ जानेवारी २०१७ ला नोटिफिकेशन निघाल. मागच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी कोर्टा मध्ये रिटपिटीशन दाखल करुन सुध्दा नियमावली सादर करुन सुध्दा कोर्टामध्ये काहीतरी अडचणी येत होत्या. नवी मुंबई मधला काही ठिकाणचा प्रश्न असेल आपल्या या शहराचा काही प्रश्न असेल मला असे वाटतय की त्या लोकांना दिलासा मिळवण्यासाठी विधीमंडळातल्या दोन्ही सभागृहामध्ये या संदर्भामधला कायदा केला आणि या राज्यामधल्या सर्वसामान्य माणसाला खरंतर झामाताई यांनी सांगीतल नागरीकांनी घर कशा पध्दतीने बांधलेले आहेत. या शहरामधल्या अनेक अंदोलनामध्ये मला माहिती आहे. मुंबईमध्ये, नागपूरला अंदोलनासाठी गेलो. झामाबाई यांनी सांगीतले ते खरं आहे. या शहरातील सर्वसामान्य भगीनीनी आपल्या स्वत:च्या गळयातील मंगळसुत्र मोडून घर बांधले त्या घरावर बुलढोझर फिरवण्याचे काम तुम्ही सगळयांनी मागच्या काळात केलं, वाईट वाटतय. आंदोलनामध्ये सगळेच होते, शिवसेना होती, भारतीय जनतापार्टी होती, अनेक वेगवेगळया पक्षाचे कार्यकर्ते होते. मला वाटत की अंदोलन करुन सुध्दा मागच्या काळामध्ये झाल नाही ते या काळामध्ये आपल्या सरकारच्या काळामध्ये झालेल आहे. मी मनापासून सांगतो शास्तीकराच्या बाबतीमध्ये सगळेजण सांगतात १०० टक्के माफ झाला पाहीजे. योगेश बहल साहेब मी तुम्हांला विनंती करतो की तुम्ही पण महापौर होता, तुम्ही आज चार चार महापौर आहात थोडस वेबसाईट बघा. विधीमंडळामध्ये झालेल्या ठरावाच्या कायदयाची आज याठिकाणी पोर्टलवरती बातमी आलेली आहे त्याची नोंद आहे. या शहरामधल्या नव्हेतर या राज्यामधल्या सर्वसामान्य माणसाला वाटत आपल घर नियमीत झाले पाहीजे. ज्यांचे अनधिकृत बांधकाम होते त्या लोकांना शास्तीकर लावलेला होता आणि या नियमावलीच्या, या कायदयाच्या माध्यमातून पुढच्या काळात हे घर नियमीत होतील त्यावेळेला कोणालाही शास्तीकर लादणार नाही अशा पध्दतीचे काम शंभर टक्के आमचे सरकार करेल आणि आम्ही शंभर टक्के करु. खरंतर या प्रश्नावर एवढी चर्चा होत असताना मलाही खुप बरं वाटलं. सगळेजण या विषयावर आपले मत व्यक्त करतात. सगळे जण या विषयावर हे झाले पाहीजे ते झाले पाहीजे असे म्हणतात. मला असं वाटतय की जे तुमच्या काळामध्ये नाही झाल तेवढे आमच्या काळामध्ये झाले आहे तेवढतरी सगळयांच जोरदार टाळया वाजवुन या सरकारच या दोन्ही आमदारांच जर मनापासून अभिनंदन केल असततर मला वाटत की या सभागृहामधल्या सगळया पत्रकारांना आणि आम्हांला निश्चितच आनंद झाला असता. मी

महापौरांना विनंती करतो या राज्याचे मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सरकारच, या शहरामधले आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप, मा.महेशदादा लांडगे या निमीत्तान अभिनंदनाचा ठराव करावा आणि हा प्रस्तावही सभागृहामध्ये मंजूर करावा एवढी मी अपेक्षा करतो मा.आमदार गौतम चाबुकस्वार यांचेही अभिनंदन करतो आणि पुढच्या काळामध्ये शहराच्या विकासासाठी अशीच आपण साथ दयावी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. उपसूचनेसह हा विषय मंजूर करावा.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, माई ढोरे यांची उपसूचना स्विकारलेली आहे.

**मा.महापौर-** संबंधित अधिका-यांनी या विषयाची माहिती दयावी.

**मा.दिलीप गावडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याबाबतीत पहीला प्रश्न दत्तात्रय साने यांचा प्रश्न होता की किती नागरीकांना या योजनेचा लाभ मिळेल. याच्यामध्ये शासनाने तीन टप्पे केलेले आहेत. ० ते ६०० स्क्वे.फुटा पर्यंत त्याच्यामध्ये निवासी मिळकतीची संख्या ३०३५६ आहे. टप्पा-२- ६०१ ते १००० सक्वे.फुटा पर्यंत निवासी मिळकती त्याची संख्या १७४५२ आहे. याचे एकुण प्रमाण पाहीलेतर १ ते ६०० पर्यंत ४७.२९ टक्के मिळकती येतात. ६०१ ते १००० पर्यंत २७.१८ टक्के मिळकती येतात. १००१ च्या पुढे १६३८० मिळकतीची संख्या आहे. दुसरा प्रश्न साने साहेबांनी विचारला होता की नवीन गावाना टॅक्स माफी दिलेली आहे ती केव्हापासून दिलेली आहे. याची माहिती घेतलेली आहे. २००८ चे अनधिकृत बांधकाम फक्त धरलेली आहेत परंतु त्यांना जी कर योजना लागू केली होती ती २०१२-१३ पासून लागू केली. मधल्या काळात शास्तीकर लागलेला नाही. २००८ पर्यंतच्या बांधकामाला शास्तीकर नाही २००८ च्या नंतर जी बांधकाम झाली त्यांना शास्तीकर लागू आहे आणि त्याची अंमलबजावणी आपण २०१२-१३ पासून केलेली आहे. मधल्या काळामध्ये आपण शास्तीकराची आकारणी केलेली नाही. घोडेकर मॅडमनी प्रश्न विचारला होता की १००१ च्या पुढे किती बांधकाम आहेत तर १००१ च्या पुढे १६३८० बांधकाम आहेत. ३१ मार्च २०१७ पर्यंत ज्या मिळकती आपल्या सॉफ्टवेअरमध्ये नोंद झालेल्या आहेत त्यांची आकडेवारी मी सांगत आहे. जसजसे मिळकतधारक आपल्याकडे अर्ज करतात तसे सॉफ्टवेअर अपडेट होते. मा.उत्तम केंदळे यांनी जीआयएस मॅपींग बद्दल विचारले होते. तर जीआयएस मॅपिंग आपण प्रस्तावीत केलेली आहे. मा.आयुक्तांनी त्या प्रस्तावाला मान्यता पण दिलेली आहे. लवकरच आपण त्याची निवीदा प्रक्रीया सुरु करत आहोत. एकूण सद्स्थितीत नोंद झालेल्या घराची संख्या ४ लाख ५० हजार ७६१ आहे. मागील वर्षीपेक्षा याच्यामध्ये २० हजाराने वाढ झालेली आहे. २०१६ मध्ये ४ लाख ३० हजार ३१८ मिळकती होत्या याच्यामध्ये २० हजाराने वाढ होऊन २०४४३ मिळकतीची भर झालेली आहे. आता सद्स्थितीत ४,५०,७६१ मिळकतीची नोंद आहे.

**मा.महापौर-** माई ढोरे यांच्या उपसूचनेसह विषय क्रमांक ५ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव उपसूचनेसह मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -८ विषय क्रमांक – ५

दिनांक- २०/४/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. कर/मुख्य/५/कावि/८६/२०१७ दि.११/०४/२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267 अ मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दिनांक 04/01/2008 रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ता करांचे दुपटी इतकी अवैध बांधकाम शास्ती सन 2012-2013 पासून आकारणीची अंमलबजावणी करणेत येत आहे.

अवैध बांधकाम शास्ती कराबाबत मा. नगरसदस्य, पदाधिकारी यांनी मा. स्थायी समिती व मा. महापालिका सभेमध्ये मुद्दे उपस्थित केले, विविध संघटना व राजकीय पदाधिकारी यांनी अवैध बांधकाम शास्ती कर न भरणेबाबत आवाहन केल्याने मिळकतधारकांमध्ये मिळकतकराचा भरणा करणेबाबत संभ्रम निर्माण झाल्याने त्याचा मिळकत कर वसूलीवर परिणाम होत असल्याने तसेच सदर विषयावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु असल्याने मनपाचे आर्थिक हित विचारात घेऊन अवैध बांधकाम शास्ती लागू करणेत आलेल्या मिळकतधारकांची प्रथमत: मूळ मिळकत कर बिलाची थकबाकीसह भरणा स्विकारुन जे मिळकतधारक अवैध बांधकाम शास्ती रक्कमेचा भरणा करु इच्छितात त्यांची अवैध बांधकाम शास्ती कराची रक्कम स्विकारावी. तसेच भरणा न केलेली अवैध बांधकाम शास्तीची रक्कम मिळकतधारकांचे नावे थकबाकी ठेऊन भरणा स्विकारणेबाबत परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/5/कावि/24/2015, दिनांक 12/01/2015 रोजीचे परिपत्रकान्वये पर्यायी संगणक प्रणाली विकसित करुन मूळ भरणा स्विकारणेत येत आहे.

सर्व महानगरपालिकांमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनाधिकृत निवासी बांधकामांवर प्रभावी आळा बसविण्याकरिता शास्तीची आकारणी करणेबाबत नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017 पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आकारणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ** | **आकारावयाच्या शास्तीचा दर** |
|---|---|---|
| **1** | **600 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम** | **शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये.** |

| | | |
|---|---|---|
| **2** | **601 ते 1000 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम** | **प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या50% दराने शास्ती आकारण्यात यावी** |
| **3** | **1001 चौरस फूटा पुढील निवासी बांधकाम** | **प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी(सध्याचे दराने)** |

शासन लेखापरिक्षणामध्ये अवैध बांधकाम शास्तीकर वसुलीबाबत उपस्थित केलेले आक्षेप विचारात घेऊन तसेच अवैध बांधकाम शास्ती कराबाबत शासन निर्णय पारित झाला असल्याने अवैध बांधकाम शास्तीची रक्कम मिळकतधारकाचे नावे थकबाकी ठेऊन भरणा स्विकारणेबाबत दिनांक 12/01/2015 रोजीचे परिपत्रकांन्वये विकसीत केलेली संगणक प्रणाली बंद करून दिनांक 11/01/2017 रोजीचे शासन निर्णयाची दिनांक 01/04/2017 पासून अंमलबजावणी करणेबाबत दिनांक 03/04/2017 रोजीचे परिपत्रक पारित केलेले आहे. शासन निर्णय व त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत निर्गत केलेले दिनांक 03/04/2017 रोजीचे परिपत्रकाचे अवलोकन करणेत आले. तसेच नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ११ जानेवारी २०१७ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये ६०० चौरस फूटापर्यंतचे निवासी अवैध बांधकामांना शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये, तसेच ६०१ ते १००० चौरस फूटापर्यंतचे निवासी अवैध बांधकामांना प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५० % दराने शास्ती आकारावी असे नमूद आहे. तथापि शहर हे औदयोगिक नगरी असल्याने सामान्य कामगारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे १००० चौरस फूट कारपेट क्षेत्रापर्यंतच्या निवासी अवैध बांधकामांना शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. तसेच सदर मिळकतींना आकारण्यात आलेली शास्ती पूर्वलक्षी प्रभावाने शासनाच्या मान्यतेने माफ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर बाबीवर शासनाकडून निर्णय होत नाही, तोपर्यंत जे मिळकतधारक शास्ती करापैकी काही रक्कम भरु इच्छितात, त्यांची रक्कम मनपास घेणे शक्य व्हावे म्हणून (मनपाचे आर्थिक हित पाहता) विकसित करणेत आलेली पर्यायी संगणक प्रणाली बंद न करता ती पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर -** एकदा विषय मंजूर झाल्यानंतर तो मागे घेता येत नाही पुढील विषय घ्यावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, विषयावर मतदान घ्यावे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक- २०/४/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
प्रशा/२/कावि/१५६/२०१७ दि.११/०४/२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची वेळोवेळी स्थापना व त्यांची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.३०३६ दिनांक २०/०९/१९९५ व ठराव क्र.३४५४ दिनांक २६/०३/१९९७ अन्वये चार प्रभाग समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. तदनंतर महापालिका सभेने ठराव क्र.९३ दिनांक ०१/०९/२०१२ अन्वये आणखी दोन ज्यादा प्रभाग समित्या निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार इकडील प्रशासकीय आदेश क्र.प्रशा/२/कावि/४१/२०१४ दिनांक २१/०१/२०१४ अन्वये एकूण ०६ प्रभाग समित्या स्थापन करुन त्यांची पुनर्रचना केलेली आहे.

महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झालेली आहे.सदरची निवडणूक चार सदस्य प्रभाग पध्दतीने पार पडली असून महानगरपालिकेचे सद्यस्थितीत ३२ निवडणूक प्रभाग अस्तित्वात आहेत. याबाबतचे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ प्रसिध्द करण्यात आले असून त्यानुसार महानगरपालिकेची नगरसदस्य संख्या १२८ इतकी झालेली आहे.

महानगरपालिकेचे सद्याचे कार्यक्षेत्र १८१ चौ.कि.मी. इतके आहे तसेच महानगरपालिकेची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेप्रमाणे १७,२७,६९२ इतकी असून सद्यस्थितीत २० लाखांपेक्षा जास्त झालेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वाढ झालेली असल्याने त्याप्रमाणात महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक आहे.तसेच कार्यालयीन कामकाजाचे समप्रमाणामध्ये विभागणी करणेकरीता सद्याची लोकसंख्या विचारात घेवून सद्या अस्तित्वात असलेल्या ०६ प्रभाग समित्यांची भौगोलिक दृष्ट्या सोईस्कर अशी व सन २०१७ चे निवडणूक प्रभागाप्रमाणे सलगता विचारात घेवून प्रभाग समित्यांची पुनर्रचनेबाबतचा तपशिल तयार करण्यात आलेला आहे तो खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | २०१७ चे सार्वत्रिक निवडणूकी प्रमाणे प्रभाग क्रमांक | क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | १०,१३,१४,१५,१६,१७ | भेळ चौक, प्राधिकरण,निगडी, पुणे ४११ ०४४. |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | १८,१९,२१,२२,२७ | एल्प्रो कंपनी आवार, लिंकरोड, चिंचवड, पुणे ४११ ०३३. |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ८,२०,२९,३०,३१,३२ | हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर,भोसरी, पुणे ४११ ०२६. |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | २३,२४,२५,२६,२८ | औंध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे ४११ ०१७. |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ३,४,५,६,७ | पांजरपोळ संस्थे समोर, पुणे नाशिक रस्ता, पुणे ४११ ०३९. |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,९,११,१२ | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या कार्यालयाची जुनी इमारत, टिळक चौक , निगडी पुणे ४११ ०४४ |

सबब वरील वस्तुस्थिती विचारात घेता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे सद्या अस्तित्वात असलेल्या ०६ प्रभाग समित्यांची पुनर्रचना करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम २९-अ अन्वये मान्यता देणेत येत आहे.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(सभागृहात गोंधळ)

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मतदान घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** विषय क्रमांक ५ मंजूर झालेला आहे. वि.क्र.५ माई ढोरे यांच्या उपसूचनेसह मंजूर केलेला आहे पुढचा विषय चाललेला आहे. आपण सभागृहात गोंधळ घालू नये, आपण सगळयांनी खाली बसावे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २९ (अ) (१) मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल अशी तरतूद आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या विचारात घेता ०८ प्रभाग समित्यांची रचना करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक-प्रशा/२/कावि/१५६/२०१७ दिनांक ११/४/२०१७ अन्वये ०६ प्रभाग समित्यांची रचना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे त्यामध्ये अंशत: बदल करुन खाली नमूद केलेप्रमाणे प्रभागांचा समावेश असलेल्या ०८ प्रभाग समित्यांची रचना करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अनु.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | २०१७ चे सार्वत्रिक निवडणूकीप्रमाणे प्रभाग क्रमांक | क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | १०,१४,१५,१९ | भेळ चौक, प्राधिकरण,निगडी, पुणे ४११ ०४४. |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | १६,१७,१८,२२ | एल्प्रो कंपनी आवार, लिंकरोड, चिंचवड, पुणे ४११ ०३३. |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | २,६,८,९ | हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर,भोसरी, पुणे ४११ ०२६. |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | २५,२६,२८,२९ | औंध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे ४११ ०१७. |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ३,४,५,७ | पांजरपोळ संस्थे समोर, पुणे नाशिक रस्ता, पुणे ४११ ०३९. |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,११,१२,१३ | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या कार्यालयाची जुनी इमारत, टिळक चौक , निगडी पुणे ४११ ०४४ |
| ७. | ग क्षेत्रीय कार्यालय | २१,२३,२४,२७ | करसंकलन कार्यालय इमारत थेरगाव |
| ८. | ह क्षेत्रीय कार्यालय | २०,३०,३१,३२ | करसंकलन कार्यालय इमारत सांगवी |

तरी सदर प्रभाग समित्यांची रचना करण्यास व त्यानुसार प्रभाग कार्यालय, आवश्यक मनुष्यबळ, आवश्यक साधनसामुग्री नवीन प्रभाग कार्यालये सुरु करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. सागर गवळी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विषय क्रमांक ६ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे. आपण खाली बसावे सभागृहात गोंधळ घालू नये.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक – ६

दिनांक- २०/४/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
प्रशा/२/कावि/१५६/२०१७ दि.११/०४/२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची वेळोवेळी स्थापना व त्यांची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.३०३६ दिनांक २०/०९/१९९५ व ठराव क्र.३४५४ दिनांक २६/०३/१९९७ अन्वये चार प्रभाग समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. तदनंतर महापालिका सभेने ठराव क्र.९३ दिनांक ०१/०९/२०१२ अन्वये आणखी दोन ज्यादा प्रभाग समित्या निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार इकडील प्रशासकीय आदेश क्र.प्रशा/२/कावि/४१/२०१४ दिनांक २१/०१/२०१४ अन्वये एकूण ०६ प्रभाग समित्या स्थापन करुन त्यांची पुनर्रचना केलेली आहे.

महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झालेली आहे.सदरची निवडणूक चार सदस्य प्रभाग पध्दतीने पार पडली असून महानगरपालिकेचे सद्यस्थितीत ३२ निवडणूक प्रभाग अस्तित्वात आहेत. याबाबतचे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ प्रसिध्द करण्यात आले असून त्यानुसार महानगरपालिकेची नगरसदस्य संख्या १२८ इतकी झालेली आहे.

महानगरपालिकेचे सद्याचे कार्यक्षेत्र १८१ चौ.कि.मी. इतके आहे तसेच महानगरपालिकेची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेप्रमाणे १७,२७,६९२ इतकी असून सद्यस्थितीत २० लाखांपेक्षा जास्त झालेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वाढ झालेली असल्याने त्याप्रमाणात महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक आहे.तसेच कार्यालयीन कामकाजाचे समप्रमाणामध्ये विभागणी करणेकरीता सद्याची लोकसंख्या विचारात घेवून सद्या अस्तित्वात असलेल्या ०६ प्रभाग समित्यांची भौगोलिक दृष्ट्या सोईस्कर अशी व सन २०१७ चे निवडणूक प्रभागाप्रमाणे सलगता विचारात घेवून प्रभाग समित्यांची पुनर्रचनेबाबतचा तपशिल तयार करण्यात आलेला आहे तो खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | २०१७ चे सार्वत्रिक निवडणूकी प्रमाणे प्रभाग क्रमांक | क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | १०,१३,१४,१५,१६,१७ | भेळ चौक, प्राधिकरण,निगडी, पुणे ४११ ०४४. |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | १८,१९,२१,२२,२७ | एल्प्रो कंपनी आवार, लिंकरोड, चिंचवड, पुणे ४११ ०३३. |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ८,२०,२९,३०,३१,३२ | हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर,भोसरी, पुणे ४११ ०२६. |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | २३,२४,२५,२६,२८ | औंध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे ४११ ०१७. |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ३,४,५,६,७ | पांजरपोळ संस्थे समोर, पुणे नाशिक रस्ता, पुणे ४११ ०३९. |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,९,११,१२ | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या कार्यालयाची जुनी इमारत, टिळक चौक , निगडी पुणे ४११ ०४४ |

सबब वरील वस्तुस्थिती विचारात घेता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे सद्या अस्तित्वात असलेल्या ०६ प्रभाग समित्यांची पुनर्रचना करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम २९-अ अन्वये मान्यता देणेबाबतची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २९ (अ) (१) मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल अशी तरतूद आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या विचारात घेता ०८ प्रभाग समित्यांची रचना करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक-प्रशा/२/कावि/१५६/२०१७ दिनांक ११/४/२०१७ अन्वये ०६ प्रभाग समित्यांची रचना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे त्यामध्ये अंशत: बदल करुन खाली नमूद केलेप्रमाणे प्रभागांचा समावेश असलेल्या ०८ प्रभाग समित्यांची रचना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अनु.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | २०१७ चे सार्वत्रिक निवडणूकीप्रमाणे प्रभाग क्रमांक | क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | १०,१४,१५,१९ | भेळ चौक, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्राधिकरण,निगडी,<br>पुणे ४११ ०४४. |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | १६,१७,१८,२२ | एल्प्रो कंपनी आवार,<br>लिंकरोड, चिंचवड,<br>पुणे ४११ ०३३. |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | २,६,८,९ | हॉकी स्टेडीयम शेजारी,<br>नेहरुनगर,भोसरी,<br>पुणे ४११ ०२६. |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | २५,२६,२८,२९ | औंध रावेत रस्ता,<br>रहाटणी,<br>पुणे ४११ ०१७. |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ३,४,५,७ | पांजरपोळ संस्थे समोर,<br>पुणे नाशिक रस्ता,<br>पुणे ४११ ०३९. |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,११,१२,१३ | पिंपरी चिंचवड नवनगर<br>विकास प्राधिकरणाच्या<br>कार्यालयाची जुनी<br>इमारत,<br>टिळक चौक , निगडी<br>पुणे ४११ ०४४ |
| ७. | ग क्षेत्रीय कार्यालय | २१,२३,२४,२७ | करसंकलन कार्यालय<br>इमारत थेरगाव |
| ८. | ह क्षेत्रीय कार्यालय | २०,३०,३१,३२ | करसंकलन कार्यालय<br>इमारत सांगवी |

तरी सदर प्रभाग समित्यांची रचना करण्यास व त्यानुसार प्रभाग कार्यालय, आवश्यक मनुष्यबळ, आवश्यक साधनसामुग्री नवीन प्रभाग कार्यालये सुरु करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(सभागृहात गोंधळ)

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक- २०/४/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
माजसं/२/कावि/१३२/२०१७ दि.११/०४/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभागृहामध्ये विविध महापुरूषांची / नेत्यांची तैलचित्रे लावण्याबाबत विविध स्तरातून/विविध मान्यवरांनी मागणी केलेली आहे. मा.महापालिका सभागृहामध्ये आज दिनांकापर्यंत खालील महापुरुषांची / नेत्यांची तैलचित्रे लावण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | नाव | स्थायी समिती ठराव क्र. | अनावरण दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अण्णासाहेब मगर | क्र. ६९९९ दि. ८/१२/९९ | |
| २ | महात्मा फुले | | |
| ३ | अण्णासाहेब पाटील | | |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज | | |
| ५ | महात्मा गांधी | | |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | | |
| ७ | प्रा.रामकृष्ण मोरे | | |
| ८ | यशवंतराव चव्हाण | स्थापत्य विभागामार्फत | १९९३ |
| ९ | इंदिरा गांधी | | |
| १० | छत्रपती राजर्षी शाहू महाराज | क्र.११२११३ दि. २५/०५/२००९ | दि. १/५/११ |
| ११ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे | | |
| १२ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले | | |
| १३ | भारतरत्न राजीव गांधी | | |

मनपा सभागृहात दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे तैलचित्र लावणेबाबत माहे नोव्हेंबर २०१२ चे महापालिका सभेमध्ये मा. भाऊसाहेब भोईर यांनी सूचना केली होती व त्यास मा. श्रीरंग बारणे यांनी अनुमोदन दिले होते. तसेच अन्य महापुरुषांची/नेत्यांची एकूण १२ तैलचित्रे लावणे संदर्भात शहरातील व शहराबाहेरील विविध स्तरातून/विविध मान्यवरांनी माहे जुलै २०१० पासून ते आज अखेर पर्यंत मागण्या केलेल्या आहेत. त्याबाबतची प्राप्त

मागणीपत्र सोबत जोडली असून कृपया त्यांचे अवलोकन होणेस विनंती आहे. सदर अनुषंगाने सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तैलचित्र बसविण्याची मागणी करणा-याचे नाव** | **पत्राचा दिनांक** | **कोणाचे तैलचित्र बसवावे त्याचे नांव** |
|---|---|---|---|
| १ | मा.सचिव, चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळ, चिंचवड | १४/०७/२०१० | कै. डॉ.श्री.घारे,पहिले नगराध्यक्ष |
| २ | अ) मा.विलास विठोबा लांडे<br>ब) मा. जयंत उर्फ अप्पा बागल<br>क) मा. लक्ष्मण पांडुरंग जगताप | २२/०८/२०१०<br>१२/०८/२०१०<br>२९/०८/२०१० | संत तुकाराम महाराज<br>संत ज्ञानेश्वर महाराज<br>श्री. मोरया गोसावी महाराज |
| ३ | छत्रपती संभाजी सेना प्रमुख श्री. शरद थोरात | ३१/१२/२०१० | श्री.छत्रपती संभाजी महाराज<br>विष्णुबुवा जोग महाराज<br>शहीद तुकाराम ओंबाळे |
| ४ | श्री. पांडुरंग परचंडराव व इतर,<br>राष्ट्रीय अध्यक्ष, क्रांतिवीर बिरसा मुंडा आदिवासी सामाजिक संघटना,<br>पुणे | ०४/०२/२०११ | क्रांतिवीर बिरसा मुंडा |
| ५ | मा.कैलास कदम<br>स्व. राजीव गांधी प्रतिष्ठान | २४/०८/२०१२<br>२२/११/२०१२<br>३१/०६/२०१३ | कै.विलासराव देशमुख |
| ६ | मा.श्रीरंग उर्फ आप्पा बारणे | २०/०७/२०१३<br>२४/०६/२०१४ | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे |
| ७ | मा.चेअरमन, डॉ.माणिकभाई देसाई,<br>ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्यादित,<br>उरळीकांचन,पुणे | ०५/०१/२०१४ | डॉ.माणिकभाई देसाई |
| ८ | मा.बाळासाहेब गव्हाणे, सदस्य महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी भाजपा | १७/०६/२०१४ | स्व.गोपीनाथ मुंढे |
| ९. | मा.आयुक्त यांचे दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये | ०६/०३/२०१७ | स्वातंत्र्यवीर सावरकर<br>शिवसेना प्रमुख बाळासाहेब |

| | | | |
|---|---|---|---|
| | सन्मा.प्रतिनिधींनी केलेली मागणी. | | ठाकरे |

उपरोक्त प्रमाणे १३ तैलचित्र मनपा सभागृहात लावणेकामी विविध मान्यवरांनी मनपाकडे मागणी केलेली आहे. सदर तैलचित्रांचे मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करणेत आले होते. तथापि प्रकरणी निर्णय झाला नाही. सदर मागण्यांच्या अनुषंगाने अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र. संकीर्ण १०/प्र.क्र.१३४/२००२/प.रा.१, दि.०७/०६/२००२ अन्वये शासकीय/निमशासकीय कार्यालयात कोणकोणत्या राष्ट्रीय / राज्यस्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावावीत याबाबत सूचना दिल्या असून त्यामध्ये वरील तैलचित्रांचा समावेश नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदर परिपत्रक सोबत जोडले असून कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती. सदर परिपत्रकान्वये एकूण २४ छायाचित्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त यापूर्वी लावलेली छायाचित्रे काढणे योग्य होणार नाही. तथापि यापुढे विहित छायाचित्रांशिवाय अन्य नेत्यांची / मान्यवरांची छायाचित्र कार्यालयात लावयाची झाल्यास शासन मान्यतेशिवाय लावण्यात येऊ नयेत असे सदर परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. तसेच याविषयी स्थापत्य विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी मा.महापालिका सभागृहामध्ये दोनच तैलचित्रे बसविणेस जागा उपलब्ध असल्याचे तोंडी कळविले असल्याने जागेच्या उपलब्धतेनुसार उपरोक्त नमूद केलेल्या महापुरुषांची/नेत्यांची तैलचित्रे मा.महापालिका सभागृहात लावणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगीता नागरगोजे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ ला आमचा विरोध आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ ला आमचा विरोध आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** आपण खाली बसावे, सभागृहात गोंधळ घालू नये. अनेक संघटनांनी नेत्यांची/महापुरुषांचे तैलचित्र लावण्याची मागणी केलेली आहे त्यावर चर्चा करावयाची असल्याने ही सभा मंगळवार दि.२५/४/२०१७ रोजी दु. २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.२०/०४/२०१७ (दु.१.४५) ची तहकूब सभा)**

<u>दिनांक – २५.०४.२०१७</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/०४/२०१७ (दु.१.४५) ची तहकूब (माहे एप्रिल-२०१७) मा.महापालिका सभा मंगळवार दि.२५.०४.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.दत्तात्रय बाबूराव साने
६) मा.अश्विनी संतोष जाधव
७) मा.सारीका शिवाजी सस्ते
८) मा.राहुल गुलाब जाधव
९) मा.वसंत प्रभाकर बोराटे
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१६) मा.गायकवाड निर्मला मनोज
१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.गीता सुशिल मंचरकर

२९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३२) मा.केशव हनुमंत घोळवे

३३) मा.मंगला अशोक कदम

३४) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३५) मा.अश्विनी भिमा बोबडे

३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३७) मा.संजय बबन नेवाळे

३८) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३९) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४२) मा.घोलप कमल अनिल

४३) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४४) मा.पवळे सुमनताई मधुकर

४५) मा.चिखले सचिन तुकाराम

४६) मा.जावेद रमजान शेख

४७) मा.यादव मीनल विशाल

४८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४९) मा.प्रमोद कुटे

५०) मा.बाबर शर्मिला राजू

५१) मा.अमित राजेंद्र गावडे

५२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५५) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५६) मा.ढाके नामदेव जनार्दन

५७) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५८) मा.करुणा शेखर चिंचवडे

५९) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६५) मा.कोमल दिपक मेवानी

६६) मा.शाम गणपतराव लांडे

६७) मा.सुजाता सुनिल पालांडे

६८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७०) मा.पाडाळे निता विलास

७१) मा.काळे उषा दिलीप

७२) मा.कोकणे संतोष अंकुश

७३) मा.पवार मनिषा प्रमोद

७४) मा.बारणे अर्चना तानाजी

७५) मा.अभिषेक गोविंद बारणे

७६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७७) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

७८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७९) मा.बारणे माया संतोष

८०) मा.निलेश हिरामण बारणे

८१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८२) मा.दर्शले रेखा राजेश

८३) मा.कलाटे राहुल तानाजी

८४) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८५) मा.ममता विनायक गायकवाड

८६) मा.कामठे तुषार गजानन

८७) मा.चोंधे आरती सुरेश

८८) मा.कस्पटे संदिप अरुण

८९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९०) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९१) मा.सुनिता हेमंत तापकीर

९२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४) मा.कुटे निर्मला संजय

९५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९७) मा.आंगोळकर सागर सुनिल

९८) मा.मुंढे उषा अंकुश

९९) मा.कदम शशिकांत गणपत

१००) मा.लोखंडे चंदा राजू

१०१) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०६) मा.संतोष बबन कांबळे

१०७) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा. चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, छत्तीसगड येथे नक्षलवादयांबरोबर झालेल्या चकमकीत शहीद झालेले सी.आर.पी.एफ.चे २७ जवान, मावळ दरोडा प्रकरणातील निधन पावलेले ३ नागरीक तसेच प्रा.रामनाथ चव्हाण-दलित चळवळीतील लेखक यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.नगरसचिव -** कार्यपत्रिका क्रमांक-२ विषय क्रमांक ७ मा.आरती चोंधे यांनी मांडलेला आहे व त्याला मा.योगीता नागरगोजे यांनी अनुमोदन दिले आहे, त्यामुळे त्यापुढील कामकाज करणे अवश्यक आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात भारतीय स्वातंत्र्य लढयात

महत्वपुर्ण योगदान देणा-या क्रांतीवीर चाफेकर बंधु यांचे तैलचित्र बसविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो ७ नंबरचा विषय आहे या विषया संदर्भात खुलासा करण्यात यावा की हा विषय करत असताना महाराष्ट्र शासनाच्या याला काही गाईडलाईन्स आहेत का आणि त्या गाईडलाईन्स ओलांडून वेगळया अशा उपसूचना दिल्यातर ते आपल्याला करता येण्यासारख आहे का. महाराष्ट्र शासनाच्या याला गाईडलाईन्स आहेत का आणि जर काही असतीलतर त्याचा खुलासा व्हायला पाहीजे. जर आपण काही उपसूचना दिल्यातर या ग्राहय धरल्या जाणार आहेत का. म्हणजे असे व्हायला नको की आज आपण एवढया मोठमोठया लोकांची नावे घेणार आणि जर ते आपल्याला करता आल नाहीतर आपल्या सभागृहाचा सुध्दा तो अपमान असेल. महाराष्ट्र शासनाच्या काय गाईडलाईन्स आहेत याचा पहील्यांदा खुलासा करावा.

**मा.महापौर-** प्रथमत: याच्यावर कोणाला काही चर्चा करायची असेलतर करावी नंतर खुलासा करण्यात येईल.

**मा.आण्णा बोदडे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये विवीध महापुरुषांची/नेत्यांची तैलचित्र लावणेबाबतचा हा विषय आहे. राज्यशासनाच्या ग्राम विकास आणि जलसंधारण विभागाच एक शासकीय परिपत्रक आहे त्यामध्ये २४ महापुरुषांची/मान्यवरांची छायाचित्र/तैलचित्र लावण्याचे निर्देश आहेत. त्यामध्ये असे म्हणलेले आहे की शासकीय / निमशासकीय कार्यालये व सभागृहात नेत्यांची छायाचित्रे लावण्याची प्रथा पुर्वापार चालत आलेली आहे. ही छायाचित्रे लावण्यावरुन काही वाद होऊ नयेत या हेतूने शासनाने वेळोवेळी शासकीय/निमशासकीय कार्यालयात कोणत्या मान्यवर राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावावीत याबाबतचे आदेश निर्गमीत केलेले आहेत. या आदेशाची संक्षीप्त माहिती मान्यवरांच्या नावासह आणि आदेशाच्या तारखेसह आहे. यावरुन असे आढळले आहे की शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये /सभागृह/शैक्षणिक संस्था इ.ठिकाणी शासनाने मान्य केलेल्या २४ मान्यवर राजकीय किंवा सामाजीक नेत्यांच्या व्यतीरीक्त इतर कोणतेही छायाचित्रे लावणे नियमानुसार योग्य नाही तथापि या आदि जिल्हा किंवा तालूका पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थानी ठराव करुन जी छायाचित्रे लावली असतील ती आता काढणे योग्य होणार नाही. मात्र यापुढे शासनाच्या मान्यतेशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात व सभागृहात शासनाचे वर नमुद केलेल्या आदेशात मान्य नेत्यांची छायाचित्रे वगळता आणखीन कोणतेही छायाचित्रे लावण्यात येऊ नयेत. सबब या परिपत्रकाव्दारे शासन असे आदेश देत आहे की यापुढे शासकीय कार्यालये सभागृह किंवा शैक्षणिक संस्था, निमशासकीय कार्यालये इ.मध्ये शक्यतो सोबतच्या परिपत्रकात

नमुद केलेल्या राष्ट्रीय अथवा राज्यस्तारावरील मान्यवर राजकीय नेते व सामाजीक कार्यकर्त्यांची छायाचित्रे लावण्याची दक्षता शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थातील अधिका-यांनी व पदाधिका-यांनी घ्यावी अशाप्रकारचा शासन निर्णय आहे. हे ७ जून २००२ चे पत्र आहे. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत हे पत्र २०१० ला दाखल झालेल आहे आणि तेंव्हापासून याबाबतची कार्यवाही चालू आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला असे पहील्यांदा सुचीत करावस वाटते की २०१० ला जर परिपत्रक आलेल असेल आणि हा विषय ठेवलेला असेलतर या विषयासोबत ते परिपत्रक जोडणे गरजेचे होतं. आपल्याकडे २०१० ला जर महाराष्ट्र शासनाच परिपत्रक आलेल असेलतर या विषयासोबत ते परिपत्रक जोडणे गरजेचे होतं. की जेणेकरुन प्रत्येकाला समजल असत की या विषयाला आम्हांला उपसूचना दयायची असेलतर कोणती दयायची कोणती नाही हे कळाल असतं. आता त्यांनी वाचून दाखवतांना सुध्दा फक्त २४ असा आकडा सांगीतला आहे. त्या २४ ची यादी आमच्यासमोर नाही. हा विषय मोघम कसा काय होणार. या विषयाला परिपत्रक यायला पाहीजे होतं.

**मा.महापौर-** परिपत्रक आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ठिक आहे मी बघीतल नाही, तरी या परिपत्रकाप्रमाणे कामकाज व्हाव एवढीच इच्छा आहे.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृहात छायाचित्र लावत असताना आपण यात म्हणलेले आहे की २४ छायाचित्राना मान्यता देण्यात आलेली आहे पण याच्या व्यतिरीक्त आज या सभागृहात अनेक मान्यवरांची छायाचित्र लावावीत, अनेक मान्यवर आहेत, संत आहेत यांची छायाचित्र लावावीत अशी याठिकाणी वेळोवेळी सूचना सभागृहात मा.सदस्यांनी केलेल्या आहेत. परंतु आपण याठिकाणी दोनच छायाचित्र लावणार असं आपण या आपल्या विषयपत्रीकेमध्ये नमुद केलेल आहे. मी मा.महापौरांना एवढीच विनंती करेल की छायाचित्र आपण आपल्या महापुरुषांची लावतो की ज्यांचे आज आपण सर्व पाईक आहोत. अशा मान्यवरांच्या दोन छायाचित्राचा निर्णय घेत असताना आपण सभागृहाच्या संम्मतीने घ्यावा त्याच्यात कुठल्याप्रकारचा वाद न करता हा आदर्श आपल्या सर्वांसमोर आहे. अशा महापुरुषांचा आदर्श संपुर्ण देशासमोर आहे. ही छायाचित्र लावत असताना मा.महापौरांनी योग्य तो निर्णय सभागृहाच्या संम्मतीने घ्यावा एवढेच सांगतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात भारतीय स्वातंत्र्य लढयात महत्वपुर्ण योगदान देणा-या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर व मा.बाळासाहेब ठाकरे यांची तैलचित्रे प्राधान्याने बसविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.बाळासाहे त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** उपसूचना स्विकारली का.

**मा.आरती चौंधे –** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृहात महापुरुषांची तैलचित्र लावण्याचा हा विषय आपल्या सभागृहापुढे आहे. निश्चितच आता खुलासा केला त्याच्यामागे २४ महापुरुष/ ज्या व्यक्ती निघुन गेल्या त्यांची मान्यता मिळाली येथून पुढ जे नवीन सगळयांच्या भावना आहेत त्याप्रमाणे भावना व्यक्त होतात त्याबद्दल काही नाही पण ते भविष्यात खरोखरच या सभागृहात लावता आले नाहीतर राज्यशासनाच्या परवानगीने भविष्यात लावता आलीतर ती लावावी यास आमचा विरोध नाही. निश्चितच समाजापुढ काम करत असताना एक आदर्श अशा महापुरुषांच व्यक्तीमत्व राहील. तरी मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती राहील याठिकाणी आपण जो काही ठराव करतो तो भविष्यात खरोखरच अंमलात येत असेलतर करा.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर या विषयाच्या संदर्भामध्ये वेगळया पध्दतीच सगळयाच मत निश्चित असू शकतं. या महापालिकेच्या सभागृहामध्ये ज्या मान्यवरांचे तैलचित्र याच्या अगोदरच्या काळामध्ये लागलेले आहेत मला वाटत की ते निश्चितच खुप चांगल्या पध्दतीने या देशासाठी काम करणारी, या शहरासाठी काम करणारे नेतृत्व आहे. मला अस वाटत की आज ज्या दोन उपसूचना याठिकाणी मांडल्या गेल्या चाफेकर बंधुच्या उपसूचनेसदंर्भात जर सांगायच म्हणलतर खरंतर अनेक क्रांतीकारक या देशामध्ये जन्माला आले. जर क्रांतीकारक जर या देशामध्ये जन्माला आले नसते तर मला वाटतं या महापालिकेच्या सभागृहामध्ये कदाचित आपल्या सगळयांना प्रश्नाची संधी मिळाली नसती. चाफेकरांच योगदान हे खरच खुप मोठ आहे. परंतु या महापालिकेमध्ये एकंदरीत परिस्थिती बघीतलीतर, या महापालिकेच्या एकंदरीत तैलचित्राच्या संदर्भात जागा जर बघीतलीतर मला वाटत की जागेची निश्चितच कमतरता आहे. याठिकाणी मी मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की पुज्यनीय बाळासाहेब ठाकरेंच्या बद्दलचा मागे एक ठरावही आला होता. बाळासाहेब ठाकरे यांच निधन झाल होत त्यावेळेस सर्व या सभागृहातील मान्यवरांन याठिकाणी तो विषय आणला पण तो मार्गी लागला नाही. महापालिकेमध्ये आमची सत्ता आल्याच्यानंतर बाळासाहेबांच्या विचारांच स्मरण करुन या महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी बाळासाहेबांनी गेली अनेक वर्षापासून आपली हयात घालवली. बाळासाहेबांच तैलचित्र या सभागृहामध्ये असल पाहीजे. अशा पध्दतीचा विचार भारतीय जनता पार्टीच्या आमच्या सर्व नेतेमंडळीचा होता. मी एवढच सांगेल की बाळासाहेबांच्या बरोबर क्रांतीवीर विनायक दामोदर सावरकरा बद्दल आपल्या सर्वांना माहिती आहे. आपण ब-याच वेळा एक गोष्ट निश्चित करतो की सावरकरांच्या व्यक्तीमत्वाकड जर बघीतलतर सावरकर यांच्या आयुष्यामध्ये या देशासाठी लढता लढता गेले. मला अस वाटत की इतीहासामधल पहील पान

असं आहे की देशाच्या स्वातंञ्याच्या नंतर एखादा कैदी तुरुंगात असु शकतो ते विनायक सावकरा बद्दल उदाहरण आहे. सावकराच्या त्यागाच्या संदर्भामध्ये सगळयानी आपण इतीहासामध्ये वाचल. मला वाटत की ते जहाजामधुन समुद्रामध्ये उडी टाकणारे समुद्र पार करुन गेले अंदमानामध्ये काळया पाण्याची शिक्षा सावरकरांना केली गेली. सावरकरांच्या आयुष्यामधल उदाहरण सांगतो- ज्यावेळेला सावरकर तुरुगांमध्ये अंदमानला होते त्यावेळेस त्यांचे कुंटूंबीय त्यांना भेटायला गेले, त्यांची पत्नी गेली आणि पत्नी गेल्याच्यानंतर पतीच्या डोळयामध्ये पन्नास वर्षाची जन्मठेप, आताची जन्मठेप तर चौदा वर्षाची आहे. सावरकरांच्या काळामध्ये पन्नास वर्षे ज्याठिकाणी कोणीही माणूस जात नाही अशा अंधारात खोली मध्ये राहणं मला वाटत की सावरकरांच्या नशिबाला आलं. त्यावेळेस त्यांची पत्नी ज्यावेळेस त्यांना भेटायला गेली त्यावेळेस पत्नीला त्यांनी विचारल तुझ्या डोळयामध्ये पाणी आलं. तीनं सांगीतल की संसार काय असतो, सावरकरांची संसाराची व्याख्या जर बघीतलीतर आताचा संसार असु शकत नाही की चिमण्यापाखरी संसार एखाद आपल खोक तयार करायच आणि त्याच्यामध्ये मुलांना जन्म घालायच आणि त्यांना खाऊ घालायचं अशा पध्दतीचा संसार सावरकरांना अभिप्रेत आहे त्यांनी त्यांच्या पत्नीला सांगीतल माझ्या या देशामध्ये जे रंजले गांजलेली माणस आहेत त्यांना स्वत:च चांगल्याप्रकारच घर मिळाल पाहीजे. चांगला निवारा मिळाला पाहीजे, इंग्रजापासून आपली सुटका झाली पाहीजे. आपल्याला स्वातंञ्य मिळाल पाहीजे आणि त्यावेळेस चांगला संसार चालु होईल देशाचा असं स्वातंञ्य मिळवण्यासाठी आपण काम केलं पाहीजे. त्यांनी आपल्या आयुष्याची पर्वा न करता स्वत:च्या कुटूंबाची पर्वा न करता ज्या देशासाठी लढले आणि मला माहिती आहे की या देशामध्ये सावरकरांना माणना-यांची संख्या जेवढी आहे तो खुप मोठा वर्ग आहे. या शहरामध्ये परिवर्तन झाल्यापासून एक गोष्ट मनापासून अशी वाटली की, पहील्यांदा या महापालिकेच्या सभागृहामध्ये कुठले तैलचित्र लावले पाहीजे ते पुज्यनीय बाळासाहेब ठाकरे यांच आणि विनायक दामोदर सावरकरांच. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, ज्या ज्या वेळेस अशा मान्यवरांचा मा.विलासराव देशमुख यांचा ठराव मांडला असेल काही जणांनी बिरसा मुंडाच्या संदर्भामधला ठराव मांडलेला असेल, पुज्यनीय आमचे नेते गोपीनाथजी मुंडे असतील या प्रत्येकांचे याठिकाणी ठराव मांडले. मी आपणास विनंती करतो की आताची जी परिस्थिती बघीतलीतर मला वाटते की प्राधान्यक्रमाने विनायक दामोदर सावरकर व बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राचा आपण ठराव मंजूर करावा अशा पध्दतीची आपल्याला विनंती करतो आणि याठिकाणी बाकीचे जे तैलचित्र आहेत ते जागा उपलब्ध झाल्याच्यानंतर उरलेली तैलचित्र लावावीत. विनायक दामोदर सावरकर व बाळासाहेब ठाकरे यांचे हे दोन तैलचित्र प्राधान्य क्रमाने या सभागृहामध्ये पहील्यांदा बसवावेत अशा पध्दतीचा ठराव आपण सर्वानी मंजूर करावा ही विनंती.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ७

दिनांक- २५/४/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
माजसं/२/कावि/१३२/२०१७ दि.११/०४/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभागृहामध्ये विविध महापुरूषांची / नेत्यांची तैलचित्रे लावण्याबाबत विविध स्तरातून/विविध मान्यवरांनी मागणी केलेली आहे. मा.महापालिका सभागृहामध्ये आज दिनांकापर्यंत खालील महापुरुषांची / नेत्यांची तैलचित्रे लावण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | नाव | स्थायी समिती ठराव क्र. | अनावरण दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अण्णासाहेब मगर | क्र. ६९९९<br>दि. ८/१२/९९ | |
| २ | महात्मा फुले | | |
| ३ | अण्णासाहेब पाटील | | |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज | | |
| ५ | महात्मा गांधी | | |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | | |
| ७ | प्रा.रामकृष्ण मोरे | | |
| ८ | यशवंतराव चव्हाण | स्थापत्य विभागामार्फत | १९९३ |
| ९ | इंदिरा गांधी | | |
| १० | छत्रपती राजर्षी शाहू महाराज | क्र.११२११३<br>दि. २५/०५/२००९ | दि. १/५/११ |
| ११ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे | | |
| १२ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले | | |
| १३ | भारतरत्न राजीव गांधी | | |

मनपा सभागृहात दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे तैलचित्र लावणेबाबत माहे नोव्हेंबर २०१२ चे महापालिका सभेमध्ये मा. भाऊसाहेब भोईर यांनी सूचना केली होती व त्यास मा. श्रीरंग बारणे यांनी अनुमोदन दिले होते. तसेच अन्य महापुरुषांची/नेत्यांची एकूण १२ तैलचित्रे लावणे संदर्भात शहरातील व शहराबाहेरील विविध स्तरातून/विविध मान्यवरांनी माहे जुलै २०१० पासून ते आज अखेर पर्यंत मागण्या केलेल्या आहेत. त्याबाबतची प्राप्त मागणीपत्र सोबत जोडली असून कृपया त्यांचे अवलोकन होणेस विनंती आहे. सदर अनुषंगाने सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तैलचित्र बसविण्याची मागणी करणा-याचे नाव | पत्राचा दिनांक | कोणाचे तैलचित्र बसवावे त्याचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मा.सचिव, चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळ, चिंचवड | १४/०७/२०१० | कै. डॉ.श्री.घारे,पहिले नगराध्यक्ष |
| २ | अ) मा.विलास विठोबा लांडे<br>ब) मा. जयंत उर्फ अप्पा बागल<br>क) मा. लक्ष्मण पांडुरंग जगताप | २२/०८/२०१०<br>१२/०८/२०१०<br>२९/०८/२०१० | संत तुकाराम महाराज<br>संत ज्ञानेश्वर महाराज<br>श्री. मोरया गोसावी महाराज |
| ३ | छत्रपती संभाजी सेना प्रमुख<br>श्री. शरद थोरात | ३१/१२/२०१० | श्री.छत्रपती संभाजी महाराज<br>विष्णुबुवा जोग महाराज<br>शहीद तुकाराम ओंबाळे |
| ४ | श्री. पांडुरंग परचंडराव व इतर,<br>राष्ट्रीय अध्यक्ष, क्रांतिवीर बिरसा<br>मुंडा आदिवासी सामाजिक संघटना,<br>पुणे | ०४/०२/२०११ | क्रांतिवीर बिरसा मुंडा |
| ५ | मा.कैलास कदम<br>स्व. राजीव गांधी प्रतिष्ठान | २४/०८/२०१२<br>२२/११/२०१२<br>३१/०६/२०१३ | कै.विलासराव देशमुख |
| ६ | मा.श्रीरंग उर्फ आप्पा बारणे | २०/०७/२०१३<br>२४/०६/२०१४ | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे |
| ७ | मा.चेअरमन, डॉ.माणिकभाई देसाई,<br>ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्यादित,<br>उरळीकांचन,पुणे | ०५/०१/२०१४ | डॉ.माणिकभाई देसाई |
| ८ | मा.बाळासाहेब गव्हाणे, सदस्य महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी भाजपा | १७/०६/२०१४ | स्व.गोपीनाथ मुंढे |
| ९. | मा.आयुक्त यांचे दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये सन्मा.प्रतिनिधींनी केलेली मागणी. | ०६/०३/२०१७ | स्वातंत्र्यवीर सावरकर<br>शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे |

उपरोक्त प्रमाणे १३ तैलचित्र मनपा सभागृहात लावणेकामी विविध मान्यवरांनी मनपाकडे मागणी केलेली आहे. सदर तैलचित्रांचे मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करणेत आले होते. तथापि प्रकरणी निर्णय झाला नाही. सदर मागण्यांच्या अनुषंगाने अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र. संकीर्ण १०/प्र.क्र.१३४/२००२/प.रा.१, दि.०७/०६/२००२ अन्वये शासकीय/निमशासकीय कार्यालयात कोणकोणत्या राष्ट्रीय / राज्यस्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावावीत याबाबत सूचना दिल्या असून त्यामध्ये वरील तैलचित्रांचा समावेश नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदर परिपत्रक सोबत जोडले असून कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती. सदर परिपत्रकान्वये एकूण २४ छायाचित्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त यापूर्वी लावलेली छायाचित्रे काढणे योग्य होणार नाही. तथापि यापुढे विहित छायाचित्रांशिवाय अन्य नेत्यांची / मान्यवरांची छायाचित्र कार्यालयात लावयाची झाल्यास शासन मान्यतेशिवाय लावण्यात येऊ नयेत असे सदर परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

तसेच याविषयी स्थापत्य विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी मा.महापालिका सभागृहामध्ये दोनच तैलचित्रे बसविणेस जागा उपलब्ध असल्याचे तोंडी कळविले असल्याने जागेच्या उपलब्धतेनुसार उपरोक्त नमूद केलेल्या महापुरुषांची/नेत्यांची तैलचित्रे मा.महापालिका सभागृहात लावणेबाबत मान्यता देणेबाबतची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात भारतीय स्वातंत्र्य लढयात महत्वपुर्ण योगदान देणा-या क्रांतीवीर चाफेकर बंधु यांचे तैलचित्र बसविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात भारतीय स्वातंत्र्य लढयात महत्वपुर्ण योगदान देणा-या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर व मा.बाळासाहेब ठाकरे यांची तैलचित्रे प्राधान्याने बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

-------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/९/कावि/२७४/२०१७
दिनांक - २७/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(कार्यपत्रिका क्रमांक-२ विषय क्रमांक ५ चे लगत-मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.कर/मुख्य/५/कावि/८६/२०१७ दि.११/०४/२०१७)

| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी –411 018.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | अवैधबांधकाम शास्ती कर आकारणीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/5/कावि/73/2017, दिनांक 3/04/2017 |
| विषय | महानगरपालिका क्षेत्रातील निवासी अनाधिकृत बांधकामांवर आकारावयाचे शास्तीबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | दिनांक 01/04/2017 पासून |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी व वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | 1. नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017<br>2. नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक संकीर्ण-2015/ प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 28 फेब्रुवारी 2017 |

परिपत्रक,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267अ मधील तरतूदीनुसार महापालिका हद्दीतील दिनांक 04/01/2008 रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ताकरांचे दुपटी इतकी अवैध बांधकाम शास्ती सन 2012-2013 पासून आकारणी करुन वसूल करणेत येत आहे.

नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017 रोजीचा शासन निर्णय पारित केला असून अवैध बांधकामांचे शास्ती कर आकारणीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. निवासी अवैध बांधकामांना खालील नमूद केलेल्या क्षेत्रफळाप्रमाणे अवैध बांधकाम शास्ती कराची आकारणी करावी.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| 1 | 600 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. |
| 2 | 601 ते 1000 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या 50% दराने शास्ती आकारण्यात यावी |
| 3 | 1001 चौरस फूटा पुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याचेदराने) |

2. परिपत्रक दिनांक 12/01/2015 अन्वये जे मिळकतधारक शास्ती करापैकी काही रक्कम भरु इच्छितात, त्यांची रक्कम मनपास घेणे शक्य व्हावे म्हणून (मनपाचे आर्थिक हित पाहता) विकसित करणेत आलेली पर्यायी संगणक प्रणाली बंद करणेत यावी.
3. मिळकत कर वसूलीकामी सुरु असलेली प्रचलित संगणक प्रणाली व वसूली पध्दत कायम ठेवावी.
4. सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 01/04/2017 पासून करणेत यावी.

**सही/-**

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – 411018.